रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १४६
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, १२ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
'लाडकी बहीण योजनेत कोणताही बदल नाही'/२
आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते रस्ता कामाचा शुभारंभ/५
भारताच्या लेकीने घडवला इतिहास/८

## छत्रपती संभाजीनगरमध्ये होणार भाजपचे महाअधिवेशन



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत भाजपचे छत्रपती संभाजीनगरला जानेवारीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात महाअधिवेशन आयोजित करण्यात येणार आहे. राज्यभरातून सुमारे ३० हजार पदाधिकारी व कार्यकर्त्यांना या अधिवेशनासाठी आमंत्रित करण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीतील महाविजय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीचे रणशिंग फुंकण्यासाठी हे दोन दिवसांचे अधिवेशन आयोजित करण्यात येत आहे. विधानसभेत अभूतपूर्व विजय मिळाल्याने भाजपचा उत्साह दुणावला असून या अधिवेशनात विजयोत्सव साजरा होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारच्या अभिनंदनाचा प्रस्ताव त्यात मांडण्यात येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजप आता सज्ज आहे.

# भारत 2035 पर्यंत उभारणार स्वत:चे अंतराळ स्थानक
## भारतीय अंतराळवीर २०४० पर्यंत उतरणार चंद्रावर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**


भारत २०३५पर्यंत स्वत:चे अंतराळ स्थानक उभारणार असून २०४० पर्यंत भारतीय अंतराळवीर चंद्रावर उतरवेल, अशी घोषणा केंद्रीय विज्ञान, तंत्रज्ञान आणि अंतराळ राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांनी बुधवारी (दि.११) केली.

अंतराळ क्षेत्रात भारत एकापाठोपाठ एक नवीन कामगिरी करत आहे. आता केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी एक मोठी घोषणा केली आहे. विज्ञान मंत्रालयाच्या कामगिरीवर दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलताना सिंह यांनी सरकारच्या महत्त्वाकांक्षी अंतराळ उपक्रमांवर प्रकाश टाकला. २०३५पर्यंत आमचे स्वतःचे अंतराळ स्थानक असणार आहे. अमेरिका आणि एक किंवा दोन इतर देशांनंतर भारताचे अंतरीक्ष स्थानक म्हणून ओळखले जाईल. २०४० पर्यंत चंद्राच्या पृष्ठभागावर एक भारतीय उतरेल, असे त्यांनी सांगितले.

भारताचा पहिला मानवी अंतराळ उड्डाण कार्यक्रम गगनयान मिशन याबद्दल बोलताना सिंग यांनी २०२४च्या अखेरीस किंवा २०२६च्या सुरुवातीला गगनयान मोहिमेअंतर्गत पहिला भारतीय अंतराळवीर अंतराळात जाणार असल्याचे सांगितले. त्याचबरोबर, भारताने खोल समुद्र मोहिमेचा भाग म्हणून सहा हजार मीटरपर्यंत खोली शोधून समुद्रतळावर मानव पाठवण्याची योजना आखली असल्याचे सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २७ फेब्रुवारी रोजी तिरुअनंतपुरम येथे गगनयान मोहिमेतील अंतराळवीरांच्या नावांची घोषणा केल्यानंतर २०३५ पर्यंत भारताचे स्वतःचे अंतराळ





स्थानक असेल, असे सांगितले होते. आता त्यांचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार असल्याचे दिसत आहे. आत्तापर्यंत जगात फक्त दोनच अंतराळ स्थानके आहेत. जर भारताने स्वतःचे अंतराळ स्थानक तयार केले तर ती केवळ ऐतिहासिक कामगिरीच नाही तर भारत स्वतःचे अंतराळ स्थानक असणारा जगातील तिसरा देशही बनेल.

२०३०च्या अखेरीस आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक सेवामुक्त होणार आहे. त्यामुळे भारतीय अंतराळ स्थानक आपल्या देशाला जागतिक लाभ देऊ शकतो. भारताचे अंतराळ स्थानक पाश्चिमात्य देशांमधील आमच्या मित्रराष्ट्रांना जागतिक संशोधन सहकार्यासाठी अवलंबून राहण्यासाठी एक महत्त्वाचे संसाधन प्रदान करेल, असे इस्रोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. 'बीएएस' पूर्णपणे स्वदेशी अभियांत्रिकीसह तयार केले जात आहे, परंतु आवश्यकतेनुसार संभाव्य जागतिक सहकार्याचा पर्याय भारताने खुला ठेवला आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळ संस्था बंद होणार असल्याने 'बीएएस' अग्रगण्य व्यासपीठ म्हणून उदयास येईल, असा विश्वास संशोधकांना आहे.

पुण्याच्या फ्लेम विद्यापीठाच्या अंतराळ विज्ञानचे सहयोगी प्राध्यापक चैतन्य गिरी यांनी सांगितले की, हे स्थानक भूराजकीयदृष्ट्या सहकार्यात्मक संशोधनासाठी महत्त्वाचे ठरेल, जेथे व्यावसायिक स्थानकांपेक्षा राज्य समर्थित अंतराळ स्थानक अधिक महत्त्वाचे असेल.

## बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराचा अमेरिकेतही निषेध



**शिकागो : वृत्तसंस्था**

बांगलादेशातीलहिंदूंवरील अत्याचाराचा निषेध आता केवळ भारतापुरता मर्यादित राहिला नसून तो संपूर्ण जगात दिसू लागला आहे. शेख हसीना यांचे सरकार कोसळल्यानंतर बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित होऊ लागला आहे. तशातच केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही या अत्याचाराविरोधात आवाज उठू लागला आहे. अमेरिकेत लोकांनी रस्त्यावर उतरून निषेध आणि निदर्शने केली.

शिकागो येथील कोरोलरी स्ट्रीम, इलिनॉय येथील राणा रेगन सेंटर येथे सुमारे ५०० भारतीय अमेरिकन हिंदूंनी बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात शांततापूर्ण निदर्शने केली. याच आंदोलक गटाने दोन महिन्यांपूर्वी हिंदूंवरील हिंसाचाराच्या विरोधात शांततापूर्ण रॅलीही काढली होती. शिकागोच्या 'इंडियन सीनियर्स'चे अध्यक्ष हरिभाई पटेल यांनी या कार्यक्रमात बांगलादेशमध्ये हिंदू मंदिरे कशी नष्ट केली जात आहेत आणि हिंदूंवर कसे अत्याचार केले जात आहेत, ते सांगितले.

शिकागो काली बारी येथील डॉ. राम चक्रवर्ती यांनी बांगलादेशातील हिंदूंची सद्यस्थिती सांगितली. लष्कर आणि पोलीसही तरुण मुली आणि मुलांना उचलून बळजबरीने धर्मांतर करत आहेत. प्रत्येक वेळी हिंदूंना लक्ष्य केले जात आहे. त्यामुळे आम्हाला हिंदूंना 'हिंदू देश' हवा आहे, अशी मागणीही त्यांनी केली.

## कोपरखैरणेमध्ये मुलाचा बुडून मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे सेक्टर ५ मधील एका इमारतीच्या निर्माणाधीन कामाच्या ठिकाणी खोदलेल्या खड्ड्यात पडून एका नऊ वर्षीय मुलाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि.११) घडली आहे. मयत मुलाचे नाव अंकित थांगुन्ना ना असून तो दुसरीत शिकत होता.

अंकित हा शेजारील झोपडपट्टीत राहायला होता व खेळण्यासाठी म्हणून तो त्या ठिकाणी गेला असल्याची माहिती मिळाली आहे. काम सुरू असलेल्या ठिकाणी संबंधित विकासकांनी सुरक्षेच्या दृष्टीने कोणतेही गेट, सुरक्षा भिंत, अथवा सुरक्षा रक्षक नेमला नसल्याने ही घटना घडल्याचा नागरिकांकडून बोलले जात आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून मराठी अर्थशास्त्र परिषदेला २० लाखांची देणगी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजाच्या हितासाठी अखंडपणे सामाजिक कार्य करणारे आणि कायम सामाजिक बांधिलकी जपणारे दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेला २० लाख रुपयांची देणगी दिली.

मराठी अर्थशास्त्र परिषद ही अर्थशास्त्र ज्ञान मराठी भाषेतून जनमानसात घेऊन जाण्याच्या दृष्टीने मागील ४७ वर्षांपासून वर्षापासून अविरतपणे कार्यरत आहे. हे कार्य करीत असताना महाराष्ट्रातील विविध शहरात दरवर्षी अधिवेशन भरवले जाते परिषदेच्या वतीने विविध उपक्रमाचे आयोजन ही केले जाते. याच परिषदेला प्रोत्साहन मिळावे याकरिता लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेला वीस लाख रुपयांचे अर्थसहाय्य केले आहे. बुधवारी (दि.११) माजी खासदार लोकनेते रामशेठ



ठाकूर यांनी २० लाखांचा धनादेश मराठी अर्थशास्त्र परिषदेला सुपूर्द केला.

या वेळी परिषदेचे अध्यक्ष प्राध्यापक डॉ. अनिल कुमार वावरे, कार्याध्यक्ष प्राध्यापक डॉ. अविनाश निकम, खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे, परिषदेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. बाळासाहेब पाटील, डॉ. संजय धोंडे, प्राध्यापक काकासाहेब ढवळे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर यांच्या नावाने परिषदेकडून पारितोषिके आणि व्याख्यानमाला चालवण्याच्या सद्हेतूने भरीव निधी परिषदेला देण्यात आला आहे, अशी माहिती परिषदेचे खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी दिली आहे तसेच त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार मानले आहेत.

## निवडक

### सांगलीत भीषण अपघात; आईसह दोन मुलांचा मृत्यू

**सांगली :** शहरातील कुमठेफाटाजवळ भीषण अपघाताची घटना बुधवारी (दि.११)घडली असून यात आईसह दोन मुलांचा जागीच मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. तासगाव-सांगली रोडवरील कुमठेफाटा येथे ओव्हरटेक करीत असताना वडापने समोरून येणाऱ्या दुचाकीला उडविल्याने आईसह दोन मुलांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. सबंधित महिलेचा पती मात्र गंभीर जखमी असून त्यांच्यावर सांगलीतील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### सतीश वाघ हत्या प्रकरणात पाच आरोपींपैकी तिघांना अटक

**पुणे :** भाजपचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांची हत्या वैयक्तिक कारणातून झाली असल्याचे पुण्याचे पोलीस आयुक्त अमीतेश कुमार यांनी सांगितले. सतीश वाघ त्यांना ठार मारण्यासाठी पाच लाख रुपयांची सुपारी दिली असून वाघ यांच्या शेजारी राहत असलेल्या व्यक्तीनेच हे सगळे कृत्य केल्याचे तपासातून समोर आले. याप्रकरणी पाच आरोपींपैकी तिघांना अटक करण्यात आली आहे.



## कोप्रोली येथे पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ
### भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र सरकारची महत्त्वपूर्ण योजना असलेल्या जल जीवन मिशनच्या माध्यमातून प्रत्येक घरी नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याचे आहे. याच पार्श्वभूमीवर बुधवारी (दि.११) पनवेल मतदारसंघातील कोप्रोली येथे नवीन पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे आणि नळ पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, राज पाटील, दुंदरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रमेश पाटील, कोप्रोली ग्रामपंचायतचे माजी सरपंच रमेश पाटील, विलास पाटील, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर फडके, विश्वजीत पाटील, यतीन पाटील, जोमा फडके, गणेश फडके, मुकेश फडके, हनुमान फुलारे, दीपक फुलोरे, राजेश फुलोरे, गणेश फुलोरे, धीरज फुलोरे, गणेश फुलोरे, चंद्रकांत राजे, सुनील सिंहा, चेतन सावंत, कृष्णा शहा, सुभाष पाटील, दिनकर पाटील, रोहित पाटील, सुनील पाटील, भरत पाटील, सागर पाटील, अक्षय पाटील, स्वप्नील पाटील, अभिनय पाटील, रमेश पाटील, गणेश म्हसकर, धनंजय पाटील, अंकुश पाटील, सुरेश पाटील, रोशन पाटील, रोहीत पाटील, धनाजी म्हसकर, कुलदीप पाडवी, मनोहर म्हसकर, सुरेश म्हसकर, सावळाराम डांगरकर, सुमीत म्हसकर, अशोक फडके, जोमा फडके, महेश शाह, प्रकाश पाटील, किरण फडके, धनंजय पाटील (वाकडी), कोप्रोलीतील महिला रंजना पाटील, दुर्गा पाडवी, रेश्मा पाटील, कुसूम डांगरकर, ज्योत्सना म्हसकर, ग्रामपंचायत प्रशासक वैदू मॅडम, ग्रामसेवक रेवनाथ धेरे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाविकास आघाडीचे आमदार, खासदार आमच्या संपर्कात
### ■ भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंचा गौप्यस्फोट

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे आमदार, खासदार आमच्या संपर्कात आहेत. महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीने खोटेपणा केला आणि लोकसभेला निवडून आले आहेत, मात्र आता त्यांच्याच नेत्यांना, आमदारांना, खासदारांना असे वाटते की, काँग्रेसमध्ये राहून काही अर्थ नाही. काँग्रेसचे अनेक लोक, जनप्रतिनिधी आम्हाला भेटत असतात, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनी म्हटले आहे. महाविकास आघाडीतले आमदार खासदार संपर्कात आहेत, असा गौप्यस्फोट बावनकुळे यांनी केला आहे.

महाविकास आघाडीतले आमदार, खासदार आम्हाला भेटतात. त्यांचे दुःख मांडत असतात. काँग्रेस नेतृत्व निवडून आलेले आमदार खासदार यांच्याशी संपर्क करत नाहीत. काँग्रेस नेतृत्वाचे दुर्लक्ष आहे. काही लोक अस्वस्थ आहेत त्यामुळे पुढे पाहू काय होते. महाविकास आघाडीला त्यांचे लोक सांभाळता येत



नाहीत ही वस्तुस्थिती आहे. आम्ही ऑपरेशन लोटस वगैरे राबवत नाही. त्याची गरजच नाही. शिवाय त्यांच्यातले लोक फुटल्यावर ते ईडी सीबीआयच्या नावे खापर फोडतात. आम्ही ईडी आणि सीबीआयकडे कधी गेलो नाही. तपास यंत्रणा त्यांचे काम करत असतात.

आमच्याकडे कुणीही आले तर आमचा पक्ष स्वागतच करतो. जेव्हा कुणी पक्षात येते किंवा जे अस्वस्थ प्रतिनिधी येणार आहेत त्यांना हे वाटते की विकसित भारताच्या संकल्पाला साथ द्यायची आहे. काही लोक विकसित महाराष्ट्राला साथ द्यायची आहे. त्यामुळे आमच्या संपर्कात काही खासदार आणि आमदार आहेत, असे बावनकुळे म्हणाले.

## खारघरमधील खाडीत देशी-विदेशी पक्ष्यांचे आगमन





**पनवेल : वार्ताहर**

थंडीची चाहूल लागताच अनेक स्थलांतरित पक्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करून आपल्याला अनुकूल प्रदेशात जात असतात. सध्या निसर्गाचे वरदान लाभलेल्या खारघर खाडीत देशी-विदेशी पक्ष्यांची रेलचेल पाहावयास मिळत असून, पक्षीप्रेमी पक्षी निरीक्षणाचा आनंद घेण्यासाठी येथे येत आहेत.

खारघर सेक्टर ८, १०, १६, १७ मधील वास्तुविहार तसेच रांजणपाडा आणि मुर्बी गावाच्या मागील बाजूस खाडी आहे. सध्याच्या घडीला या ठिकाणी विविध रंगी, आकर्षक पक्ष्यांचे थवे दिसू लागले आहेत आणि त्यांची छबी टिपण्यासाठी पक्षीप्रेमींमध्ये चढाओढ निर्माण झाली आहे. खाडीकिनारा असलेली पाणथळ जागा पक्ष्यांसाठी नेहमीच आकर्षणाच्या केंद्र ठरल्या आहेत. थंडीची चाहूल सुरू होताच पक्ष्यांनी या ठिकाणी मोठ्या संख्येने हजेरी लावली आहे. यामध्ये रशिया आणि मध्य आशियामधील स्थलांतरित पक्ष्यांचे खारघरमध्ये मोठ्या संख्येने आगमन झाले आहे.

यामध्ये आफ्रिकेतील रोहित (फ्लेमिंगो), सारस बगळे, रेड बुलबुल, बी इटर, गुलाबी स्टारलिंग, कॉमन किंगफिशर, पॅसिफिक गोल्डन प्लेव्हर, जांभळा हेरॉन, मार्श हॅरिअर, चिमणी, घार, गरुड, किंगफिशर, लाजरी पाणकोंबडी, शराटी, शेकाटे, पाणकावळे, दुर्मिळ ब्लॅक टेलेड गॉडविट्स, कर्ल्यू सँडपायपर्स या पक्ष्यांनी खारघर खाडीमध्ये आपले बस्तान मांडल्यामुळे पक्षीप्रेमींमध्ये उत्साह संचारला आहे.

खारघरला निसर्गाने मोठ्या प्रमाणात खाडीकिनारा उपलब्ध करून दिला आहे, मात्र तेथे मोठ्या प्रमाणात डेब्रिजचा भराव करीत आहेत. तसेच काहींनी शेड उभारले असून, शेडपर्यंत चारचाकी वाहन जावे यासाठी डेब्रिजचा भराव करून रस्ता तयार केला आहे. त्यामुळे सिडको, पनवेल पालिका आणि वन विभागाने या डेब्रिजमाफियांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## दारूच्या नशेत पडून एकाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील खांदाड येथील इमारतीच्या टेरेसवरून दारूच्या नशेत खाली पडून मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि.११) घडली आहे.

सविस्तर वृत्त असे की, मयत रंजित मुन्नू भारती (वय ३५, मूळ रा. राघेपटह, जि. गोरखपूर) हा दारू पिऊन दारूच्या नशेत खांदाड येथील इमारतीच्या टेरेसवर फोनवर बोलत होता. या वेळी त्याचा तोल जाऊन तो टेरेसवरून खाली असलेल्या स्कूल बसच्या टपावर पडला. त्यास उपचाराकरीता माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मयत घोषित केले.

या घटनेची नोंद माणगांव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## परभणीत जमावबंदीचे आदेश

**परभणी : प्रतिनिधी**

परभणी शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील संविधान प्रतिकृतीच्या नुकसानीमुळे बुधवारी (दि.११) निषेधासाठी जमलेल्या जमावाने आंदोलनाला हिंसक वळण दिले. त्यामुळे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३चे कलम १६३ लागू केले आहे.

शहर व जिल्ह्यात असलेले तणावाचे वातावरण पाहता हे कलम लावण्याची विनंती पोलिस अधीक्षकांनी केली होती. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी ते लागू केले. यामुळे जिल्हाभर सार्वजनिक ठिकाणी पाचपेक्षा जास्त व्यक्तींना जमा होण्यास प्रतिबंध आहे. भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स केंद्र, ध्वनिक्षेपके

**आंदोलकांकडून दगडफेक**



व इंटरनेट सेवा बंद ठेवण्याचे आदेश केले आहेत. ११ डिसेंबरच्या दुपारी १ वाजेपासून हे आदेश लागू राहतील. ध्वनिक्षेपकावरून ते पोलिसांनी जाहीर करावे, असेही आदेशात म्हटले आहे.

दुपारी आंदोलन चिघळल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते, आंदोलक यांची बैठक घेतली. जिल्हाधिकारी गावडे यांनी आंदोलकांच्या मागण्या जाणून घेतल्या. सर्वांना शांततेचे आवाहन करण्यात आले, मात्र याच वेळी अचानक आंदोलक महिलांचा एक घोळका जिल्हाधिकारी कार्यालयात घुसला आणि त्यांनी तोडफोड सुरू केली. एकीकडे शहरात तणावपूर्ण शांतता असताना पुन्हा आंदोलन चिघळल्याची परिस्थिती निर्माण झाली, मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली आहे.

परभणीत संविधान पुस्तिकेच्या विटंबनेनंतर बुधवारी जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती, मात्र या हाकेला हिंसक वळून लागले असून आंदोलकांनी मोठ्या प्रमाणावर बंद दुकानांवर दगडफेक केली.

## निवडक

### बांगलादेशींवर कारवाईची मागणी



**उरण :** बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी व रोहिंग्या नागरिकांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीकोणातून ९ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पदाधिकारी कार्यकर्त्यांनी उलवे नोड पोलीस चौकीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन रजाने यांची भेट घेतली. भेट घेऊन उलवे नोड गव्हाण विभागात बांगलादेशी आणि रोहिंगे बऱ्याच प्रमाणात राहतात त्यांना पकडून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून त्यांना त्यांच्या देशात पाठवण्यात यावे, असे लेखी निवेदन देण्यात आले.

### राष्ट्रीय योगासन स्पर्धा नेरुळमध्ये

**नवी मुंबई :** आर्ट ऑफ लर्निंग फाउंडेशन आणि लायन्स क्लब चॅम्पियन्स यांच्या सहकार्याने २० वी राष्ट्रीय योगासन स्पर्धा – नवराष्ट्र १५ डिसेंबर २०२४ रोजी नेरूळ, नवी मुंबई येथे आयोजित केली जाणार आहे. हा प्रतिष्ठित उपक्रम डॉ. रीना अग्रवाल, प्रताप मुदलियार, आणि दिनेश अग्रवाल यांच्या अथक प्रयत्नांमुळे यशस्वी होत आहे. या स्पर्धेत ५ वर्षांपासून ८० वर्षांपर्यंतच्या वयोगटातील ४०० हून अधिक स्पर्धक देशभरातील विविध राज्यांतून सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे लायन संजीव सूर्यवंशी, वाइस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर, लायन्स इंटरनॅशनल, असतील.

# ‘लाडकी बहीण योजनेत कोणताही बदल नाही’

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबद्दल रिल्स व व्हिडिओच्या माध्यमातून देण्यात येणारी माहिती दिशाभूल करणारी माहिती असल्याचे आमदार आदिती तटकरे यांनी म्हटले आहे

महायुती सरकारची ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजना लोकप्रिय ठरली आहे. विधानसभा निवडणुकीत या योजनेमुळे महायुतीने २३० आमदारांचा टप्पा गाठला. या योजनेत बदल झाल्याची माहिती सोशल मीडियावर येत आहे. त्यासंदर्भात तत्कालीन महायुती सरकारमध्ये महिला आणि बालकल्याण मंत्री असलेल्या आदिती तटकरे यांनी स्पष्टीकरण केले आहे. या योजनेत कोणताही बदल झालेला नाही? असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

आमदार आदिती तटकरे यांनी म्हटले आहे की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबद्दल रिल्स व व्हिडिओच्या माध्यमातून दिशाभूल करणारी माहिती समाज माध्यमांवर प्रसारित करण्यात



येत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू झाल्यापासून आतापर्यंत योजनेच्या निकषांमध्ये कोणताही बदल झालेला नाही.

एक महिला लोकप्रतिनिधी म्हणून याबाबतीत मी स्वतः जातीने लक्ष ठेवून आहे. तरी, याबाबत समाज माध्यमांतून होणाऱ्या अपप्रचारास कोणीही बळी पडू नये, असे आवाहन आदिती तटकरे यांनी केले आहे.

‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेचा लाभ राज्यातील जवळपास अडीच कोटी महिलांना मिळत आहे. या योजनेत पात्र महिलांना महिन्याला १५०० रुपये देण्यात येत आहे. ही रक्कम थेट बँक खात्यात जमा होत आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणूक जाहीरनाम्यात ही रक्कम २१०० रुपये करण्याचे आश्वासन महायुतीने दिले होते. त्यामुळे आता महायुतीचे सरकार आल्यामुळे या योजनेची रक्कम २१०० रुपये होण्याची शक्यता आहे.

निवडणुकीपूर्वी या योजनेच्या यशाची कल्पना महाविकास आघाडीला आली होती. त्यामुळे महाविकास आघाडीने निवडणूक जाहीरनाम्यात महिलांना दर महिन्याला तीन हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु जनतेने महायुतीच्या बाजूनेच आपला कौल दिला.

## खोट्या बिलांद्वारे कोट्यवधींच्या बोगस इनपुट टॅक्स क्रेडिटचा दावा करणाऱ्या कंपनीच्या सूत्रधारास अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

शासनाच्या वस्तू व सेवाकर विभागाकडून वस्तू व सेवाकर चुकवेगिरी संदर्भात सुरु असलेल्या धडक मोहिमेअंतर्गत मे. एसपीजी मल्टी ट्रेड प्रा.लि. या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रिन्स गोयल, वय ५३ वर्षे यांस दि. ०२ डिसेंबर २०२४ रोजी अटक करण्यात आली असल्याची माहिती राज्यकर उपआयुक्त यांनी दिली आहे.

मे. एसपीजी मल्टी ट्रेड प्रा.लि. या कंपनीवर वस्तू व सेवा कर विभागाकडून अन्वेषण कार्यवाही सुरू करण्यात आली होती. या संदर्भातील तपासात कंपनी प्रत्यक्षात कोणत्याही वस्तू व सेवांचा पुरवठा न करता खोटी बिले आणि बोगस वाहतूक पावत्या जारी करत असल्याचे आढळून आले. त्याद्वारे कंपनीने रूपये ६४.०६ कोटीच्या इनपुट टॅक्स क्रेडिटचा दावा करून शासनाची फसवणूक केली आहे.

मे. एसपीजी मल्टी ट्रेड प्रा.लि. या कंपनीच्या सर्व कामकाजास व व्यवहारास जबाबदार असल्यामुळे प्रिन्स गोयल यांचा या फसवणूकीत प्रत्यक्ष सहभाग असल्याचे आढळून आहे. ही संपूर्ण कार्यवाही षण्मुगाराजन एस. (भा.प्र.से.), राज्यकर सहआयुक्त, अन्वेषण–क तसेच नयना गोंदावले, राज्यकर उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली, विलास नाईक आणि अजित विशे, सहायक राज्यकर आयुक्त यांच्याकडून संयुक्तपणे राबविण्यात आली. या कार्यवाहीत राज्यकर निरीक्षकांचे उल्लेखनीय योगदान आहे.

सन २०२४–२५ मध्ये केलेल्या या ९ व्या अटकेद्वारे महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभागाने कर चुकवेगिरी करणाऱ्यांना कठोर इशारा देण्यात आला आहे.

## ग्राम ऊर्जा स्वराज राष्ट्रीय पुरस्काराबद्दल मान्याचीवाडीचे महावितरणतर्फे अभिनंदन

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय पंचायत पुरस्कार सोहळ्यात सातारा जिल्ह्यातील मान्याचीवाडी गावाला ग्राम ऊर्जा स्वराज विशेष पंचायत पुरस्कार मिळाल्याबद्दल गावाचे सरपंच रवींद्र माने यांचे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थाकीय संचालक लोकेश चंद्र यांनी अभिनंदन केले.

नवी दिल्ली येथे बुधवारी (दि.११) राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सरपंच रविंद्र माने यांनी हा पुरस्कार व एक कोटी रुपयांचा निधी स्वीकारला. देशभरातील एक लाख ९४ हजार ग्राम पंचायतींनी केंद्र सरकारच्या स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यापैकी ४५ ग्रामपंचायतींची पुरस्कारांच्या विविध वर्गवारीसाठी निवड करण्यात आली. शाश्वत विकास ध्येय (एसडीजी) स्थानिक पातळीवर गाठण्यासाठी केलेल्या कामगिरीचा पुरस्कारासाठी विचार करण्यात आला. राज्यातील पहिले सौर ग्राम ठरलेल्या मान्याचीवाडीमध्ये विजेची संपूर्ण गरज सौर ऊर्जेद्वारे अर्थात हरित ऊर्जेद्वारे भागवली जाते.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी हे गाव राज्यातील पहिले सौरग्राम आहे. गावातील घरांची तसेच ग्राम पंचायत कार्यालय, शाळा, पथदिवे, पाणी पुरवठा योजना इत्यादींची विजेची गरज गावातच सौरऊर्जा निर्मिती करून भागविली जाते. मान्याचीवाडीतील सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण ऑगस्ट महिन्यात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते.

महावितरणने राज्यात शंभर गावे सौर ग्राम करण्याची मोहीम हाती घेतली असून तिचे काम चालू आहे. यामध्ये गावातील सर्व घरांवर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून त्या घरांना वीज पुरवठा केला जाईल. त्यासोबत गावातील ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, रस्त्यावरील दिवे, पाणी पुरवठा यासाठीचा वीजपुरवठाही सौरऊर्जेद्वारे केला जाईल.

मान्याचीवाडी पाठोपाठ पुणे जिल्ह्यातील टेकवडी हे राज्यातील दुसरे सौरग्राम ठरले आहे. या गावातही सर्व घरांना सौर ऊर्जेद्वारे वीज पुरवठा होतो. या गावाच्या सौर ऊर्जीकरण प्रकल्पाचे उद्घाटन तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑक्टोबर महिन्यात ऑनलाईन पद्धतीने केले होते. राज्यात प्रधान मंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत आतापर्यंत ७३,७९० घरांच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यात आले आहेत. त्यांची एकत्रित क्षमता २९२ मेगावॅट असून ५९२ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे.

## गव्हाण विद्यालयात सायबर सुरक्षा मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा याविषयीचे मार्गदर्शन करण्यात आले.

श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज गव्हाण कोपर येथे मंगळवारी (दि.१०) उलवे रोड पोलीस स्टेशनच्या अंतर्गत सायबर सुरक्षेविषयी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पोकळे तसेच त्यांचे सहकारी पाटील साहेब, व जुबुर्डे साहेब यांनी मार्गदर्शन केले.

पोकळे साहेब यांनी सायबर सुरक्षा विषयी मार्गदर्शन करताना



अलीकडील काळामध्ये सायबर क्राईम याचे वाढत असलेले स्वरूप आणि त्यावरती घ्यावयाची खबरदारी याविषयीची माहिती आपल्या विद्यार्थ्यांना देऊन काय खबरदारीचे पावले उचलावेत या संदर्भात मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना वेळप्रसंगी जर काही समस्या निर्माण झाली तर त्यांनी कोणत्या हेल्पलाईनशी कॉन्टॅक्ट करावा त्या हेल्पलाइनदेखील विद्यार्थ्यांना देण्यात आल्या फ्रॉडच्या लिंक आल्यानंतर आपण काय करावे आणि काय करू नये याबाबतही त्यांनी अनमोल मार्गदर्शन केले तसेच पाटील सर यांनी विद्यार्थ्यांनी स्वतः जागरूक राहून आपल्या कुटुंबाला आणि आपल्या नातेवाईकांना सायबर क्राईम बाबत जागृत करावे मोबाईलचे दुष्परिणाम देखील त्यांनी सांगितले त्याच पद्धतीने विद्यार्थ्याने वयाच्या २५व्या वर्षापर्यंत कठोर परिश्रम करावे असा सल्लाही त्यावेळी त्यांनी दिला

या कार्यक्रमाला उपस्थित विद्यालयाचे प्राचार्य गोडगे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर सन्माननीय रवींद्र भोईर आणि ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख पाटोळे बी.पी. घरत, पाटील, ठाकूर मॅडम, पाटील मॅडम, तसेच इयत्ता बारावीचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाची प्रास्ताविक खेडकर सर यांनी केले आणि मान्यवरांचे आभार विद्यालयाचे प्राचार्य यांनी केले.

## तरुणाला केली तिघांनी मारहाण

**नवी मुंबई :** किरकोळ भांडणातून एकाला मारहाण केल्याची घटना नोसिलनाका येथे घडली. याप्रकरणी एका मुलीसह दोन मुलांवर रबाळे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. परिसरात राहणाऱ्या तरुणाची त्याच परिसरातील एक मुलगी व दोन मुलांसोबत ८ डिसेंबरला भांडण झाले होते. याच भांडणातून रात्री दोघेजण तरुणाच्या घरी जाऊन शिवीगाळ करू लागले. तरुण घराबाहेर आला असता त्याला जबर मारहाण करून चाकूने वार केला. याप्रकरणी तिघांवर रबाळे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

## बाळशास्त्री जांभेकर पत्रकार पुरस्कार सारंग दर्शनेंना जाहीर

**नाशिक : प्रतिनिधी**

सार्वजनिक वाचनालय नाशिक या संस्थेतर्फे दरवर्षी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकारिता पुरस्कार देण्यात येतो. सन २०२४ चा पुरस्कार सारंग शंतनू दर्शने यांना जाहीर झाला आहे.



या पुरस्काराचे वितरण पुण्याचे दै. सकाळचे संपादक सम्राट फडणीस यांच्या हस्ते रविवार, ५ जानेवारी,२०२५ रोजी सायंकाळी ६.००वा. ग्रंथालयभूषण मु.शं. औरंगाबादकर सभागृहात देण्यात येणार असल्याची माहिती वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.दिलीप फडके व प्रमुख सचिव देवदत्त जोशी यांनी दिली.

पत्रकार पुरस्कारासाठी दै.दिव्य मराठीचे संपादक श्री. अभिजित कुलकर्णी, दै. लोकमतचे संपादक मिलिंद कुलकर्णी, दै. सकाळचे अभय सुपेकर तसेच सार्वजनिक वाचनालयाचे पदसिद्ध सदस्य म्हणून अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, प्रमुख सचिव श्री. देवदत्त जोशी या सदस्यांच्या निवड समितीने सदर पुरस्काराची निवड केली. ११००० रुपयांचा धनादेश, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. २००८ पासून सावानाच्या वतीने हा पुरस्कार दिला जातो.

आजवर अतुल देऊळगावकर, प्रकाश अकोलकर, वि. वि. करमरकर, मोरेश्वर बडगे, देवेंद्र गावंडे, सुरेश भटेवरा, जय देशमुख, अभिजित घोरपडे, अपर्णा वेलणकर, संतोष आंधळे, सुनील चावके, राजीव खांडेकर, विजय बाविस्कर, निलेश खरे, श्रीकांत बोजेवार या मान्यवर पत्रकारांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

## बोरघाटात २ वाहनांच्या धडकेत १ जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावरील नवीन बोगद्यात पहाटे कंटेनरने समोरील ट्रकला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात कंटेनर चालक जखमी झाला आहे.

मुंबई–पुणे एक्सप्रेस वेवरून कंटेनर (जीजे १८ – बीटी २१४५) हा पुण्याहून मुंबईकडे माल घेऊन जात असताना बोरघाटात आडोशी येथील नवीन बोगद्यात आला असता, कंटेनरचा ब्रेक फेल झाल्याने आणि चालकाचे नियंत्रण सुटल्याने, बोगद्याच्या भिंतीला घासत जाऊन समोरील चालणाऱ्या ट्रक (एमएच ४८ सीक्यू ७७५४) ला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात कंटेनरची केबिन पूर्णपणे दबल्याने चालक अडकला होता. तत्काळ बाहेर काढून, खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले. अपघातग्रस्त दोन्ही वाहने बाजूला घेऊन एक्सप्रेस वे वाहतूकीसाठी चालू करण्यात आला.

## तालुका विधी सेवा समिती व दिवाणी न्यायालय–मुरूड तर्फे विद्यार्थ्यांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळा

**मुरुड : प्रतिनिधी**

विद्यार्थ्याने कोणत्याही संस्थेतून शिक्षण घेऊन उच्चपदावर पोहचण्याचे ध्येय व चिकाटी स्वतःच्या मनात ठेवून नावलौकिक करण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे आवाहन मुरूड तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष व दिवाणी न्यायाधीश जी.आर. तिवारी केले.

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरूड–जंजिरा व तालुका विधी सेवा समिती व दिवाणी न्यायालय–मुरूड यांच्या सयुंक्त विद्यमाने नागरिकांसाठी कायदेविषयी जागरूकता उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कायद्यांची माहिती करून देण्यासाठी कार्यशाळेचे





आयोजन बुधवार (दि. ११) रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी तालुका विधी सेवा समिती मुरूडचे अध्यक्ष व दिवाणी न्यायाधीश जी.आर.तिवारी होते आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना उपयुक्त अशा विविध कायद्यांची तोंडओळख करून सोबतच शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी. प्राचार्य डॉ. साजिद फ. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे वकील संघटनेचे सचिव. ॲड. डी.एन.पाटील तर सदस्य ॲड. इकरा शेखाणी व ॲड. एम.एम.सतविडकर यांच्या सह मुरुड न्यायालयातील लिपिक मतीन अधिकारी उपस्थित होते. या मार्गदर्शन कार्यशाळेत ॲड. डी.एन.पाटील यांनी हुंडाबंदी कायदा, ॲड. इकरा शेखाणी यांनी परिवार व त्याचे संगोपन कायदा तसेच ॲड. एम.एम. सतविडकर यांनी बालकांचे लैगिंक शोषण रोखण्याविषयी कायदा याची अत्यंत सोप्या भाषेत विविध कलमांची माहिती उपस्थित सर्वाना करून दिली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. स्वाती खराडे यांनी केले तर प्रास्तविक प्रा. शोएब खान यांनी केले.

## जैन समाजाची नागोठणे नगरीत भव्य रथ यात्रा

**नागोठणे : बातमीदार**

ऐतिहासिक जैन मंदिराच्या जीर्णोद्धार कार्यक्रमाचे औचित्य साधून १५० वर्षांनी प्रथमच बुधवारी नागोठणे नगरीत गुरुदेव चंद्रप्रभस्वामी भगवान यांच्या आशीर्वादाने व जैन मंदिर विश्वस्त कमिटीचे अध्यक्ष घिसूलाल जैन व जुगनशेठ जैन, कार्याध्यक्ष किशोरशेठ जैन व नरेंद्रशेठ जैन तसेच सर्व विश्वस्त कमिटीच्या मार्गदर्शनाखाली जैन बांधव व भगिनींच्या वतीने सर्व भगवंत देव देवातांची नगर प्रदक्षिणा भव्य रथ यात्रा काढण्यात आली.

या रथ यात्रेला नागोठणे नगरीत ठिकठिकाणी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला तसेच रथ यात्रेचे गुलाब पुष्पवृष्टीने स्वागत करण्यात आले.



गुलाब पुष्पवृष्टी करून ग्रामस्थांनी केले स्वागत

रथ यात्रेच्या स्वागतासाठी नागोठणे नगरीतील घरांसमोर रांगोळी काढण्यात आली होती.दरम्यान या रथ यात्रेच्या माध्यमातून भगवंताच्या कृपादृष्टीने सर्वांना सुख–शांती लाभावी असा संदेश देण्यात आला.

बुधवार दि.११ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता नागोठणे येथील जैन मंदिरा समोरून देव देवता १२ रथांमध्ये विराजमान झालेले १७ देव देवतांची मूर्ती नगर प्रदक्षिणा घालण्यासाठी प्रारंभ झाला. भव्य रथ यात्रा बाजारपेठ मार्गे नागोठणे पोलीस स्टेशन व राष्ट्रवादीचे नेते दिलीपभाई टके यांच्या निवासस्थाना समोरून नागोठणे ग्रामपंचायत मार्गे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणात रथ यात्रा आल्यानंतर तेथेही गुलाब पुष्पवृष्टी झाल्यानंतर रथ यात्रा गांधी चौक मार्गे केएमजी विभाग मार्ग पुन्हा जैन मंदिरा जवळ आल्यानंतर नगर प्रदक्षिणा पुर्ण झाली. जैन बांधव अतिशय उत्सहाने नाचत रथ यात्रेत सामील झाले होते. या रथ यात्रेचे सर्व समाज बांधवांनी पुष्पवृष्टीने स्वागत केले. या रथ यात्रेच्या स्वागताचे बॅनर संपूर्ण नागोठणे शहरांत लावण्यात आले होते.

## मोरे महिला महाविद्यालयाचा मुंबई विद्यापीठाच्या 'आविष्कार'मध्ये सहभाग

**रोहे : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास कक्षातर्फे आयोजित १९ व्या 'आविष्कार २०२४–२५' या अंतरमहाविद्यालयीन संशोधन महोत्सवाचा विभागीय (रायगड) राउंड केएलई महाविद्यालय, कळंबोली येथे सोमवार, (दि. ९) रोजी पार पडला. स्पर्धेतील पोस्टर फेरीनंतर यांपैकी 'cassi-brew' हा प्रकल्प पोडीयम राऊंड ला निवडला गेला

एम बी मोरे महिला महाविद्यालयातील २१ विद्यार्थिनींनी ०६ संशोधन प्रकल्पांचे या महोत्सवात सादरीकरण केले.





नवकल्पनांवर आधारित मानवी क्षमता, औषधशास्त्र, महिलांचे आरोग्य, शेअर मार्केट आदी विषयांवर आधारित हे ०६ प्रकल्प पदवी स्तरातील विद्यार्थिनींनी तयार केले. स्पर्धेतील पोस्टर फेरीनंतर यांपैकी 'cassi-brew' हा प्रकल्प पोडीयम राऊंड ला निवडला गेला.

महिला महाविद्यालयाच्या 'रिसर्च सेलच्या' प्रमुख प्रा. प्रतिमा भोईर आणि प्रा. दिपाली वारंगे, प्रा. नरेश घाग, प्रा. ममता बिंद, प्रा . दर्शना शिंदे आणि ग्रंथपाल निर्मला थोरात यांनी सहभागी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

## निवडक

### शिरढोण येथून तरुण बेपत्ता

**पनवेल :** ३३ वर्षीय राजा संजय सिंग हा शिरढोण पनवेल येथून न सांगता निघून गेला आणि तो परत न आल्याने तो हरवला असल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली. त्याचा रंग गोरा, उंची ५.७ इंच, बांधा मजबूत आहे. त्याने अंगात हाफ ब्राऊन रंगाचा टी-शर्ट आणि हाफ पॅन्ट घातली आहे. या तरुणाबाबत अधिक माहिती असल्यास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जयेंद्र माने यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पडघे गावात मुलाचे अपहरण

**पनवेल :** पडघे गावात शिवमंदिर तलावाजवळील मोकळ्या जागेत बैल पाहण्यासाठी गेलेल्या अकरा वर्षीय मुलाचे अपहरण केल्याप्रकरणी आरोपीवर तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राजू राऊत हे पडघे येथे राहत असून पाच डिसेंबर रोजी त्यांचा मुलगा बैल पाहण्यासाठी तलावाजवळील मोकळ्या जागेत गेला होता, मात्र तो घरी परत आला नाही. त्याचा आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला मात्र तो सापडला नाही. त्याचा रंग सावळा, उंची चार फूट, चेहरा लांबट आहे. अंगात काळा शर्ट, काळी जीन्स आहे. त्याला हिंदी आणि बिहारी भाषा बोलता येते.

### घोट कॅम्पमधून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** घोट कॅम्प तळोजा येथे राहणारी २४ वर्षीय ईशा सुशन कांबळे ही घरातून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली. इशा कांबळेचा रंग सावळा, उंची चार फूट, आठ इंच, आणि ती अंगाने सडपातळ आहे. तिने अंगात निळी जीन्स, निळा टॉप त्यावर फुलांची नक्षी आणि चष्मा घातला आहे. पायात लाल चप्पल घातली असून सोबत कॉलेजची बॅग आहे आणि मोबाईल आहे. या तरुणीबाबत अधिक माहिती असल्यास तळोजा पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### बेशुद्ध व्यक्तीचा मोबाईल चोरला

**पनवेल :** बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या व्यक्तीचा मोबाईल चोरल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात सात डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.सुजाता शिंदे या खांदा कॉलनी येथे राहत असून त्यांचे पती सुशांत शिंदे यांचा १५ नोव्हेंबर रोजी मृत्यू झाला. याची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. १५ नोव्हेंबर रोजी त्या घर कामासाठी गेलेल्या असताना त्यांचे पती फेरफटका मारण्यासाठी घरातून मोबाईल घेऊन गेले. या वेळी त्यांनी ब्रिज खाली असून छातीत दुखत असल्याचे सांगितले. या वेळी त्यांची पत्नी डी मार्ट नवीन पनवेल येथील ब्रिज खाली आले असता खूप गर्दी जमलेली होती. बेशुद्ध अवस्थेत असलेल्या पतीला त्यांनी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल केले. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले, मात्र त्यावेळेस त्यांचा मोबाईल सापडून आला नाही. अनोळखी व्यक्तीने त्यांचा मोबाईल चोरून नेला.

# अनधिकृत भंगारमाफिया सक्रिय

## पनवेल पोलिसांसह महापालिकेने कारवाई करण्याची मागणी



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्थानका जवळ भंगार विक्रेत्यांनी बस्तान बसवल्याने नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. तरी अशा भंगार माफियांवर पनवेल शहर पोलिसांसह पनवेल महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी जोर धरीत आहे.

अनधिकृत भंगार विक्रेते हे सहसा लोकवस्तीच्या बाहेर भंगाराचा व्यवसाय करत असतात. भंगार व्यवसायात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारांनी शिरकाव केला असल्याने अश्या विक्रेत्यांकडे चोरीचा माल जास्त प्रमाणात आढळत असतो. भंगार विक्रेत्यांकडे राज्यातून तसेच परराज्यातून चोरलेल्या दुचाकी किव्हा चारचाकी वाहने आणली जातात. अश्या वाहनांचे सुट्टे भाग करून ते स्टील मार्केट, कुर्ला किव्हा मुंबई येथे चोर बाजारात विक्री साठी पाठवले जातात. या धंद्यात झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या भुरट्या चोरांची संख्या फार मोठ्या प्रामाणात आहे. पोलिसांमार्फत अश्या विक्रेत्यांवर करडी नजर असते.

यातील काहीजण तर पोलिसांचे खबरी म्हणून सुद्धा काम करत असतात. चोरीसारखे गुन्हे घडल्यावरपोलीस यंत्रना सर्वात पहिले संशयाची पाहिली नजर हि या गुन्हेगारी प्रवृत्ती च्या लोकांवर जात असून त्यांच्याकडून चोरीच्या गुन्ह्या संबंधित काही माहिती मिळते का? याची चाचपणी केली जाते. पनवेल औद्योगिक वसाहत तसेच तळोजा औद्योगिक वसाहती मध्ये बरेच कारखाने बंद पडले आहेत.

मोठे भंगार व्यवसाय करणारे हे रीतसर सर्व परवानग्या घेऊन बंद पडलेल्या कंपन्यांमधील भंगाराच्या बोली लावून कंपनीतील भंगार रीतसर विकत घेऊन स्टील कंपन्यांना विकले जाते. स्टील कंपन्या त्यावर पुन्हा प्रक्रिया करून ते लोखंड विविध लोखंडाच्या वस्तू बनवण्या साठी उपयोगात आणतात. काही वर्षांपूर्वी इस्पात कंपनीने बाहेरच्या देशातून जहाज भरून भंगार भारतात आणले होते. ते रायगडाच्या समुद्रात उतरवत असताना त्यातून हजारो टन भंगाराची चोरी करण्यात आली होती.

चोरी करण्यात आलेला माल रायगड तसेच नवी मुंबई परिसरातील भंगार विक्रेत्यांना विकला गेला होता. सदरच्या कंपनीने रितसर पोलीस तक्रार केल्यावर पोलिसानी ठीक ठिकाणच्या भंगार विक्रेत्यांनवर छापे मारून त्यांना मुद्देमाला सकट अटक करण्यात आली होती. गुन्हेगारांचे आश्रय स्थान हे अनधिकृत भंगार विक्रेत्यांचे अड्डे असून अश्या लोकांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांना खरा धोका आहे. पनवेल रेल्वे स्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात ८ ते १० भंगार खरेदी विक्रीचा बेकायदेशीर व्यवसाय गेली कित्येक महिन्यांन पासून दिवस रात्र सुरू आहे.

### गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा वावर

*पनवेल रेल्वे स्थानकातून रात्रीच्या वेळी कामावरून येणार किव्हा पहाटे लवकर कामावर जाणारा महिला वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. या भंगार विक्रेत्याच्या अड्ड्यावर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोंकाचा नित्य वावर असल्याने भविष्यात अश्या महिलांना चैन स्नॅचिंग किंवा यांच्यावर अतिप्रसंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पनवेल शहर पोलिसांनी तसेच पनवेल महापालिकेने धडक कारवाई करावी, अशी* मागणी पनवेलमधील नागरिक करीत आहेत.

# कळंबोली यार्डात रेल्वे मालगाडीचे डबे घसरले

## पाच तासानंतर डबे रूळावर



**पनवेल : वार्ताहर**

कोकण रेल्वे मार्गावरील कळंबोली यार्ड किलोमीटर संख्या केएलएमजी-२२ वर रेल्वे संख्या केटीआयजी-एव्हीसी एप्टी बीसीएनच्या मालवाहू रेल्वेमधील दोन रेल्वेचे डबे रुळावरून बुधवारी (दि.११) पहाटे साडेपाच वाजता घसरल्याने कोकण रेल्वे मार्गावर आपत्कालीन स्थिती निर्माण झाली, मात्र याची गंभीर दखल घेत रेल्वे सुरक्षा बल व रेल्वे व्यवस्थापनातील कर्मचाऱ्यांनी मिळून पाच तासाच्या अथक प्रयत्नानंतर घसरलेले मालगाडीचे दोन डबे रेल्वे रुळावर पूर्ववत आणण्यात यश मिळवले.

कोकण रेल्वे मार्गावर मालवाहून नेणाऱ्या मालगाडीचे दोन डबे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्याने रूळावरून घसरले. ही घटना पहाटे साडेपाच वाजता घडली. याबाबतची रितसर तक्रार साडेसहा वाजता पनवेलमधील स्टेशन मास्तर कडे नोंदवण्यात आली.

त्यानंतर रेल्वे सुरक्षा बल व रेल्वे कर्मचारी व्यवस्थापनाने यासंबंधी गंभीर दखल घेऊन रेल्वे रूळावरून घसरलेल्या एसईआर-३००७९३०३८९४, ईआर- ३००२०२६१४३३ या क्रमांकाचे मालगाडीचे डबे पूर्ववत रेल्वे रूळावर आणण्यास प्रयत्न केले. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास दोन्ही घसरलेले रेल्वे वेळ डबेवावरून आणून कळंबोलीतील रेल्वे यार्डमध्ये आणण्यात आले.

या महत्त्वाच्या कामगिरी बजावण्यासाठी अवनीश वर्मा, विरेशपत सिंह, आर के साळवी, वाय. पी. सिंह, ओ पी सिंह, अधिकारी वर्ग या वेळी उपस्थित होता.

# कामोठे सेक्टर १८ ते ३१ येथे रस्ता नव्याने तयार करा

## डॉ. अरुणकुमार भगत यांची मागणी

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे येथील सेक्टर १८ ते ३१ या दरम्यानचा रस्ता नव्याने तयार करण्यात यावा, अशी मागणी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी पनवेल महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

डॉ. भगत यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे येथील सेक्टर-१८ अहींसा सोसायटी, प्लॉट नं.०१ व ०२ पासुन ते सेक्टर ३१ के. के. सिनेमापर्यंतचा रस्ता मागील अनेक वर्षांपासून कच्चा रस्ता आहे. सध्या कामोठे येथे शहराचा चेहरामोहरा बदलल्याच्या अनुषंगाने अनेक विकास कामे सुरु आहेत. कामोठे शहर हे जास्तीत जास्त स्मार्ट शहर अशा पध्दतीने होईल या दृष्टीकोनातून प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे हा रस्ता प्रमुख रस्ता आहे व वर्दळीच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास खूप महत्त्वाचा रस्ता आहे. हा रस्ता डांबरीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. या रस्त्याच्या अजुबाजुला आता मोठ्या प्रमाणावर इमारती व यवसायही विकसित केले जात आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे येथील सेक्टर-१८ अहिंसा सोसायटी, प्लॉट नं.०१ व ०२ पासुन ते सेक्टर ३१ के. के. सिनेमापर्यंतचा रस्ता येथील पक्का करून देऊन या परिसरातील नागरिकांना उपकृत करण्यात यावे, असे निवेदनात नमुद केले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आगरी महोत्सवाचे उद्घाटन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मनोरंजन, ज्ञान आणि प्रबोधन ही त्रिसूत्री अंगीकारून आगरी समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध असणाऱ्या आगरी युथ फोरम या संस्थेच्या वतीने गेली २० वर्षे अखिल भारतीय आगरी महोत्सवाचा आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात येते. यंदाही या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रकल्पग्रस्तांचे नेते रायगड जिल्ह्याचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या आगरी महोत्सवाचे उद्घाटन मंगळवारी (दि.१०) झाले.

संत सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुल डोंबिवली येथे या विसाव्या अखिल भारतीय आगरी महोत्सवाचे आयोजन १० ते १७ डिसेंबर दरम्यान करण्यात आले आहे. या उद्घाटन सोहळ्याला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण समितीचे अध्यक्ष दशरथ दादा पाटील, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, माजी मंत्री आमदार रवींद्र चव्हाण, आमदार राजेश मोरे, आमदार सुलभाताई गायकवाड, आगरी महोत्सवाचे अध्यक्ष गुलाब वझे, उपाध्यक्ष विश्वनाथ रसाळ, कार्याध्यक्ष जालिंदर पाटील, सरचिटणीस रामकृष्ण पाटील, चिटणीस प्रकाश भंडारी, खजिनदार पांडुरंग म्हात्रे यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डोंबिवली शहरात गेली वीस वर्ष आगरी महोत्सवचे आयोजन आगरी युथ फोरमच्या वतीने करण्यात येते पारंपारिक सांस्कृतिक स्वरूप या महोत्सवाला वीस वर्षे आहे तुम्ही आणि आम्ही सर्वांनी डोंबिवली शहरात कुठलाही भेदभाव न करता या महोत्सवाचा आयोजन आपण करता आणि त्यामुळेच या महोत्सवाला एक सांस्कृतिक ओळख प्राप्त झाली आहे आगरी युथ फोरमच्या वतीने आपण या शहरात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सुद्धा आयोजित केला होता हे आम्ही सर्वांनी आणि महाराष्ट्राने पाहिले आणि याचा सार्थ अभिमान मला आहे, असे प्रतिपादन या उद्घाटन सोहळा वेळी माजी मंत्री आमदार रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केले.

आपण आपली संस्कृती जपली पाहिजे ती रुजवली पाहिजे आणि ती मोठीही केली पाहिजे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या उद्घाटनावेळीी केले ते पुढे म्हणाले संघर्ष केला की यश नक्की मिळते याची प्रचिती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामांतराच्या आंदोलनावेळी आली.

आपण आगरी कोळी समाज सर्वजण एकत्र होऊन या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झालात आणि प्रकल्पग्रस्तांचे झुंजार नेते दिवंगत दि.बा.पाटील साहेबांचे नाव येत्या काळात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिले जाईल शंका नाही पण या आंदोलनात डोंबिवलीकरांनी पण मोठे योगदान दिले याचा सार्थ अभिमान मला आहे. आगरी कोळी भाषा, आपली संस्कृती आपण जपली पाहिजे आणि ती वाढवली पाहिजे असंही ते पुढे म्हणाले.







**पनवेल :** एकादशीनिमित्त खानाव आणि भाणघर येथे विठ्ठल रखुमाईच्या मंदिरात भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले. आयोजकांकडून स्वागत करण्यात आले. या वेळी माजी पं.स.सदस्य भूपेंद्र पाटील, तालुका चिटणीस यतीन पाटील उपस्थित होते.

# मानवी हक्क दिनानिमित्तच्या चर्चासत्राला प्रतिसाद



**पनवेल : वार्ताहर**

आजच्या मानवी हक्क दिनानिमित्त पनवेल शहर पोलिसांनी शहरातील बान्स स्कूल येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

आजचा हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून साजरा करण्याबाबत महाराष्ट्र राज्य, मानवी हक्क आयोग, मुंबई यांनी आदेश प्रेरित केले होते. त्यानुसार शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटीमध्ये असणार्या बान्स स्कूलमध्ये पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या माध्यमातून मानवी हक्क दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमादरम्यान सपोनि सारिका झांजुर्णे यांनी उपस्थित विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना मानवी हक्क संरक्षण या विषयावर मार्गदर्शन उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका शुभदा भगत, ८० ते ९० विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



**पनवेल :** शहरातील लाईन आळी येथे वन फिटनेस स्टुडिओ नुकताच सुरू करण्यात आला. त्याचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते व माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या उपस्थितीत झाले. या वेळी किशोर जगे, सपना पाटील, सुरेखा भेंडे, सुनील महाडीक, जगदीश गायकर, स्टुडिओचे ओनर श्रेयस देसाई, दीपक चव्हाण, एमडी शीतल सोनवणे, राजेश बहीरा, बाबा नाईक आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# राष्ट्रहिताशी तडजोड नको

काही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अहवालांवरून ज्येष्ठ काँग्रेस सदस्यांचे अमेरिकी अब्जाधीश जॉर्ज सोरोस आणि त्यांच्याशी संबंधित संघटनांशी संबंध असल्याचे दिसून आले आहे. भारताविरोधात काम करणाऱ्या संघटनांशी असलेल्या या कथित संगनमतामुळे राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण होतो असा आरोप करीत भाजप खासदारांनी यासंदर्भात संसदेत चर्चेची मागणी केल्यानंतर त्यावरून गदारोळ सुरू आहे. कोण आहेत हे जॉर्ज सोरोस?

**जॉर्ज सोरोस हे एक अमेरिकन अब्जाधीश असून त्यांचा जन्म हंगेरीतील एका ज्यू कुटुंबातील आहे. शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करणाऱ्या सोरोस यांनी यातूनच अब्जावधी डॉलर कमावले असून या पैशातून त्यांनी हजारो शाळा आणि हॉस्पिटल सुरू केले आहेत. लोकशाही आणि मानवाधिकार यांच्यासाठी कथित काम करणाऱ्या संघटनांना ते निधी पुरवतात. त्यांचे फाऊंडेशन जवळपास १२० देशांमध्ये काम करते. त्यांच्या या कामामुळेच ते अनेकदा वादात सापडले असून अनेक देश त्यांच्याविरोधात आहेत. सध्या याच सोरोस आणि काँग्रेस पक्षाच्या संबंधांवरून संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात खडाजंगी सुरू आहे. विरोधक सातत्याने उद्योजक अदानी यांच्यावर अमेरिकेत करण्यात आलेल्या कारवाईचा मुद्दा उपस्थित करून राजकारण करत असताना सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने जॉर्ज सोरोसचा मुद्दा उपस्थित करून काँग्रेस पक्षाला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. काँग्रेस पक्षाच्या काही ज्येष्ठ सदस्यांचे सोरोस आणि त्यांच्याशी संबंधित संघटनांशी संबंध असल्याचा आरोप भाजप खासदारांनी सोमवारी राज्यसभेत केला. स्वाभाविकच यावरून बराच गदारोळ झाला. परंतु भाजपने या मुद्यावरून काँग्रेसला घेरणे बुधवारीही सुरूच ठेवले व यासंदर्भातील गांधी घराण्याचे संबंध अधोरेखित करताना काही नवीन आरोपही केले. सोनिया गांधी आणि 'फोरम ऑफ डेमोक्रॅटिक लीडर्स इन एशिया पॅसिफिक फाऊंडेशन' यांच्यात संबंध असल्याचा आरोप यासंदर्भात करण्यात आला आहे. यामुळे भारताची प्रतिमा मलीन होत असून राष्ट्रीय सुरक्षेबाबतही चिंता निर्माण झाली आहे. या फोरमचा काँग्रेसशी संबंध काय, भारतविरोधी व पाकसमर्थक धोरणास काँग्रेसचा पाठिंबा आहे का आणि सोरोस फाऊंडेशनशी काँग्रेसचा काय संबंध आहे, असे प्रश्न यासंदर्भात काँग्रेस पक्षाला विचारले जात आहेत. ही संघटना भारतात लोकशाही नसल्याचे दावे करते. तसेच जम्मू आणि काश्मीरला स्वातंत्र्य गरजेचे असल्याची भाषा करते. या परदेशी शक्तींच्या षड्यंत्रामध्ये काँग्रेसचा हात आहे का याचे उत्तर काँग्रेसला द्यावेच लागेल. त्यामुळे या विषयावर देशाच्या संसदेत चर्चा होणे आवश्यक आहे. हे सगळे आरोप बिनबुडाचे असून यात काही तथ्य नाही असा दुबळा युक्तिवाद तेवढा काँग्रेस आणि समाजवादी पक्षासह इतर विरोधी पक्षांनी केला आहे. ऑर्गनाइज्ड क्राइम अँड करप्शन रिपोर्टिंग प्रोजेक्ट या फ्रेंच पब्लिकेशनने या प्रोजेक्टसाठी त्यांना विदेशी फंडिंग मिळत असल्याचे व ते भारतावर विशेष लक्ष देत असल्याचेही म्हटले आहे. या रिपोर्टचा आणि त्यांच्या विदेशी फंडिंगचाही जॉर्ज सोरोस यांच्याशी संबंध असल्याचे सांगितले जाते. भारतात संसदेचे अधिवेशन सुरू असते तेव्हाच शेतकरी आंदोलन, मणिपूर हिंसा, हिंडनबर्ग अहवाल यांसारख्या घटना कशा घडतात असा सवालही भाजपच्या सदस्यांनी उपस्थित केला आहे. भारताविरोधात काम करणाऱ्या काही शक्ती सोरोस फाऊंडेशनसोबत जोडलेल्या असून अशा देशाविरोधात काम करणाऱ्या लोकांविरोधात आपण नक्कीच एकजुटीने लढायला हवे.**

# भाजपचे ज्येष्ठ नेते स्व. गोपीनाथ मुंडे



गोपीनाथ मुंडे म्हणजे स्वकर्तृत्वाने घडलेला माणूस. राजकारणाचा कुठलाही वारसा नसताना राजकारणात शिखर गाठणारा अद्वितीय नेता. गोपीनाथ पांडुरंग मुंडे यांचा जन्म बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नाथरा या गावी एक सामान्य शेतकरी कुटूंबात १२ डिसेंबर १९४९ रोजी झाला. त्यांची आज जयंती.

वडील पांडुरंग मुंडे आणि आई लिंबाबाई मुंडे हे वारकरी होते. आई–वडिलांसोबत मुंडेसाहेबांनी वयाच्या १४व्या वर्षी पंढरपूरची पायी वारी केली. त्यानंतर सलग सात वर्षे पंढरीची पायी वारी केली. त्यामुळे मुंडेसाहेबांवर बालपणापासूनच अध्यात्मिक प्रभाव राहिला. त्यांची घरची परिस्थिती बेताची होती. १९६९मध्ये त्यांचे पितृछत्र हरपले. त्यानंतर त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी आई आणि मोठे बंधू पंडितअण्णा यांनी उचलली. भाऊ पंडितअण्णा यांनी स्वतःचे शिक्षण सोडून गोपीनाथ मुंडे यांचे शिक्षण पूर्ण केले. मुंडेसाहेब शालेय जीवनात खुप हुशार नव्हते, पण शिक्षणाचे महत्त्व त्यांनी ओळखले, म्हणून शालेय शिक्षणानंतर उच्च शिक्षणासाठी त्यांनी अंबाजोगाईजवळ केली.

गोपीनाथ मुंडे यांच्या राजकीय प्रवासाला सुरुवात झाली ती महाविद्यालयीन जीवनात. महाविद्यालयात होणाऱ्या अंतर्गत निवडणुकांमध्ये मुंडेसाहेब नेहमीच किंगमेकर ठरायचे. प्रत्येक निवडणूक ते सहजपणे जिंकायचे. अंबाजोगाईत शिक्षण घेत असताना त्यांची भेट झाली ती प्रमोद महाजन यांच्याशी. प्रमोद महाजन यांनी मुंडेसाहेबांच्या विद्यार्थीदशेतील नेतृत्व करण्याचे गुण ओळखले आणि त्यांच्याशी मैत्री झाली. महाजन यांनी मुंडेसाहेबांवर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली.


मुंडेसाहेबांनी त्यांच्या दिलदार स्वभावामुळे अनेक मित्र जोडले. विलासराव देशमुख यांच्याशी त्यांची असलेली मैत्री राजकारणात चर्चेचा विषय होता. विलासराव देशमुख काँग्रेसचे आणि मुंडेसाहेब भाजपचे तरीही त्यांच्यात मतभेद कधी आला नाही. ते दोघेही विधानभवनापर्यंत एका गाडीने प्रवास करायचे. त्यानंतर छगन भुजबळ हेही साहेबांचे चांगले मित्र होते. त्यानंतर साताऱ्याचे छत्रपती उदयनराजे भोसले यांच्याशी मुंडेसाहेबांचा खूप स्नेह होता. राजेंना कुठलीही निवडणूक न लढवता मंत्रिमंडळात येण्याचे आमंत्रण मुंडेसाहेबांनी प्रथम दिले होते. राजू शेट्टी आणि मुंडेसाहेब यांचे नेहमीच एका रथाचे दोन चाके असल्यागत होते. साहेब म्हणायचे राजू शेट्टी तुम्ही ऊस उत्पादक शेतकऱ्यांची भूमिका घ्या. मी ऊस तोडणाऱ्या मजुरांची भूमिका घेतो. त्यामुळे तर मुंडे आणि शेट्टी हे मैत्रीचे नाते अगदी घट्ट झाले होते. पक्षीय चौकटीबाहेर आपली मैत्री जपली म्हणून साहेब सत्तेत नसले तरी मतदारसंघातील विकासकामे कधी थांबली नाहीत.

२०१४च्या लोकसभा निवडणुकीत मुंडेसाहेबांनी महाराष्ट्र पिंजून काढला. देशात भाजपची सत्ता आली पाहिजे हा एकच ध्यास डोळ्यासमोर ठेवून त्यांनी दांडगा प्रचार केला. शेवटी साहेबांच्या प्रयत्नाला यश आले व २०१४च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मोठा विजय मिळवला व राज्यात महायुतीचे ४२ खासदार निवडून आले व देशात केंद्रीय ग्रामविकासमंत्री असे महत्त्वाचे खाते मिळाले. इतकी वर्षे सत्तेत येण्यासाठी साहेबांनी संघर्ष केला, परंतु सत्तेत आल्यावर मुंडेसाहेबांना सत्तेची फळे मात्र चाखता आली नाहीत.

२९ जून २०१४ रोजी मुंडेसाहेबांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारमध्ये ग्रामविकासमंत्री म्हणून शपथ घेतली होती. या विजयानंतर मुंडेसाहेबांच्या स्वागताची भव्य दिव्य तयारी बीड जिल्ह्यातील जनतेने केली होती. जिल्ह्यातील एका सर्वसामान्य कुटुंबातील तरुणाला केंद्रात मंत्रिपद मिळाल्याचा आनंद गगनात मावत नव्हता. साहेब ३ जून २०१४ रोजी दिल्लीवरून जिल्ह्यात येणार होते. भगवानबाबांच्या समाधीवर मस्तक टेकवणार होते, परंतु काळाने घाला घातला आणि मुंडेसाहेब ३ जून २०१४च्या पहाटे दिल्ली विमानतळाकडे जात असताना त्यांच्या गाडीला एका टॅक्सीने जोरात धडक दिली. तेव्हा साहेबांना तातडीने रुग्णालयात भरती करण्यात आले, पण त्याच वेळी त्यांना आलेल्या हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले आणि एका झुंजार नेत्याचा शेवट झाला.

**(साभार : इंटरनेट)**

# प्रसिद्ध अभिनेते शिवाजीराव गायकवाड उर्फ रजनीकांत



शिवाजीराव रामोजीराव गायकवाड ऊर्फ रजनीकांत हे एक बहुभाषिक भारतीय अभिनेता, मनोरंजन व्यवसायातील सर्वांत प्रसिद्ध व्यक्ती, चित्रपटातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व, आणि ख्यातनाम तमिळ चित्रपट अभिनेते व परोपकारी व्यक्ती आहेत. एम.जी.रामचंद्रन यांच्यानंतरचे सर्वात यशस्वी कलाकार म्हणून रजनीकांत यांची ख्याती आहे. रजनीकांत गेल्या तीन दशकांहून अधिक काळ तमिळ चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवत आहेत. तमिळ आणि एकंदरीतच दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट, प्रेक्षकांची अलोट गर्दी खेचून आणणारे, आपल्या संवादफेकीबद्दल आणि आपल्या विशिष्ट अभिनय शैलीसाठी ते प्रसिद्ध आहेत. रजनीकांत यांचा जन्म १२ डिसेंबर १९५० रोजी बंगळूर येथे एका महाराष्ट्रीयन मराठी भाषक कुटूंबात झाला. त्यांचे खरे नाव शिवाजीराव गायकवाड असून वडिलांचे रामोजीराव आणि आईचे जिजाबाई गायकवाड. कुटुंबीयांच्या चार अपत्यांपैकी ते सर्वात लहान. त्यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील कोयाळी आहे असे सांगितले जाते तसेच जेजुरीचा खंडेराय त्यांचे कुलदैवत असल्याचे मध्यंतरी रजनीकांत यांनी एका मुलाखतीत म्हटले होते. बंगळुरू येथील आचार्य पाठशाळा हशाळेत त्यांचे शालेय शिक्षण झाले व रामकृष्ण मिशनच्या महाविद्यालयात त्यांचे उच्चशिक्षण पूर्ण झाले. महाविद्यालयात ते नाटकात भाग घेत. येथेच शिवाजीरावमधला एक कलाकार जन्माला आला. १९६८–१९७३दरम्यान रजनीकांत यांनी मद्रास आणि बंगळूरमध्ये अनेक ठिकाणी कुली आणि कारपेंटरसारखी वेगवेगळी कामं केली. नंतर त्यांना बस ट्रानस्पोर्ट सर्व्हिसमध्ये कंडक्टर (वाहक) म्हणून काम मिळाले, पण अभिनयाची आवड त्यांनी जोपासली होती. असाच एका दिवशी त्यांनी मद्रास फिल्म इन्स्टिटट्यूटची जाहिरात बघितली, मग काय त्यांच्यातला अभिनेता गप्प बसेना. ते घराच्यांचा विरोध असताना राज बहादूर या मित्राच्या मदतीने चेन्नैला चित्रपटातील अभिनय शिकण्यासाठी गेले. मद्रास फिल्म इंस्टीट्यूटमध्ये एका नाटकांत त्यांना के.बालचंद्र या तमिळ डिरेक्टरने बघितलं आणि त्यांना तमिळ शिकण्याचा सल्ला दिला. शेवटी के बालचंद्र यांनीच रजनीकांत यांना त्यांचा तामिळ ड्रामा फिल्म अपुर्वा रांगनगालमध्ये एक लहानसा रोल दिला. हीच रजनीकांत यांचा डेबू फिल्म होय. सुरुवातीला रजनीकांत यांना लहानसहान तेपण निगेटिव्ह रोल्सच मिळाल असत. त्यांनी ४ वर्षात ४ वेगळ्या भाषांमध्ये ५० सिनेमे केले, तेपण तरी त्यांना फारसे यश कुठे मिळाले नाही. १९८०मध्ये डॉन या हिंदी सिनेमाच्या तमिळ रिमेक बिल्लासाठी रजनीकांत याना लीड रोल ऑफर मिळाली. या सिनेमाने त्यांना चांगलं नाव मिळवून दिलं. इथून त्यांचे सिनेमे एकापाठोपाठ एक हिट झाले आणि ते तमिळ सुपरस्टार झाले. ते भारतातील व आशिया खंडातील ('शिवाजी द बॉस' या चित्रपटानंतर) सर्वाधिक मानधन मिळविणारे कलाकार ठरले. 'शिवाजी द बॉस' चित्रपटासाठी त्यांना तब्बल २६ कोटी रुपये मानधन देण्यात आले होते. रजनीकांत हे भारताबाहेर अनेक देशात लोकप्रिय अभिनेते आहेत, तसेच जगातील सर्वाधिक मोठा चाहता वर्ग असलेला अभिनेता म्हणून गिनिज बुकमध्ये त्यांचे नाव नोंदले गेले आहे. जपानमध्ये त्यांचे चित्रपट अधिक लोकप्रिय आहेत. दक्षिणपूर्व आशिया आणि जपानमध्ये रजनीकांत यांचा मोठा चाहतावर्ग आहे व त्यांचे फॅनक्लब्सही आहेत.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# कसे असेल पॅन २.० आणि काय असतील फायदे?

पॅन कार्ड हे ओळखपत्र म्हणून आणि केवायसी प्रक्रियेसाठी महत्त्वाचे आहे. आता सरकारने पॅन २.० डिजिटल स्वरूपात आणण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पासाठी सरकारने १४३५ कोटी रुपये खर्च केले असून याला पुढच्या पिढीचे पॅन कार्ड म्हणून ओळखले जात आहे जे वापरणे ग्राहकांसाठी अत्यंत सोयीस्कर असणार आहे.



सध्या तरी पॅन १.० सर्व ठिकाणी त्याच्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपात केवायसी उद्देशांसाठी वापरला जाऊ शकत नाही आणि तो इलेक्ट्रॉनिक किंवा भौतिक स्वरूपात पत्त्याचा पुरावा म्हणून वापरला जाऊ शकत नाही. आधार त्याच्या सर्व स्वरुपात (ऑनलाइन/भौतिक) वर नमूद केलेल्या बहुतेक उद्देशांसाठी वापरला जाऊ शकतो.

पॅन २.० संपूर्णपणे डिजिटल असेल, परंतु ज्यांना फिजिकल पॅन कार्ड हवे असेल त्यांनाही ते मिळवता येईल. फिजिकल कार्डसाठी फक्त ५० (देशांतर्गत) शुल्क लागेल. पॅन २.०मध्ये पेपरलेस प्रक्रिया असेल आणि ई–पॅन तुमच्या रजिस्टर्ड ईमेल आयडीवर पाठवले जाईल.

सध्या एम–आधार किंवा ई–आधार केवायसी प्रक्रियेसाठी वापरता येते, पण डिजिटल पॅन १.० अनेक ठिकाणी मान्य नाही. तज्ज्ञांच्या मते, पॅन २.०मध्ये क्युआर कोडसारख्या नव्या सुविधा असल्याने भविष्यात ते केवायसीसाठी वापरता येऊ शकते.

सध्याच्या परिस्थितीत काही ठिकाणी, विशेषतः ऑफलाइन व्यवहारांसाठी किंवा डिजिटल साधनांचा अभाव असलेल्या भागांत, फिजिकल पॅन कार्ड आवश्यक राहू शकते, मात्र डिजिटल पायाभूत सुविधा वाढल्यास आणि लोकांमध्ये डिजिटल पॅन स्वीकृत झाल्यास फिजिकल कार्डची गरज कमी होईल.

डिजिटल पॅन २.०च्या डायनॅमिक क्युआर कोड कार्यक्षमतेबद्दल आणि हा क्युआर कोड वापरकर्त्याचा पत्ता दर्शवू शकतो की नाही याबद्दल अधिक स्पष्टता आवश्यक आहे.

तज्ञांचे मत आहे की, पॅन २.० डिजिटल युगासाठी उपयुक्त ठरेल, परंतु फिजिकल कार्ड काही ठिकाणी वापरले जाईल, जसे की मोठ्या रकमेचे व्यवहार, पासपोर्ट अर्ज, ड्रायव्हिंग लायसन्स इत्यादींसाठी.

# अष्टपैलू क्रिकेटर युवराज सिंग

### निमित्त



भारताचा फायटर क्रिकेटपटू युवराज सिंग हा लहानपणी क्रिकेटचा नव्हे, तर टेनिस आणि रोलर स्केटिंगचा चाहता होता. त्याने राष्ट्रीय स्तरावरील १४ वर्षांखालील स्केटिंग चॅम्पियनशिपनही जिंकले आहे, मात्र वडील भारताचे माजी क्रिकेटपटू असल्याने त्यांना क्रिकेटला जास्त महत्त्व द्यावे लागले. युवराजचा जन्म चंदिगड येथे १२ डिसेंबर १९८१ रोजी झाला. आज त्याचा वाढदिवस.

युवीचे वडील योगराज सिंग हे भारताचे माजी वेगवान गोलंदाज आहेत. त्यांना भारताकडून एक कसोटी व सहा वनडे सामने खेळले आहेत. क्रिकेटमधील निवृत्तीनंतर ते सिनेसृष्टीकडे वळले. ते पंजाब सिनेसृष्टीचे अभिनेता आहेत. युवी लहानपणी क्रिकेटमध्ये जास्त पारंगत नव्हता. तो लहानपणी नवजोतसिंग सिद्धू यांच्याकडून क्रिकेटचे प्रशिक्षण घेत होता. त्या वेळी युवी साध्या फुल टॉसवरतीही बाद होत असल्याने सिद्धूंनीही त्याच्याकडून अपेक्षा करणे सोडले होते.

युवीला त्याच्या वडिलांनी फलंदाजीच प्रशिक्षण दिले आहे. त्यांनी त्याला वेगवान गोलंदाजीचा सामना करायला शिकवला. पुढे युवीला मुंबईतील इएलएफ–वेंगसकर क्रिकेट अकादमीत पाठवण्यात आले. युवीने वयाच्या १३व्या वर्षी म्हणजेच १९९५साली १६ वर्षांखालील पंजाब संघाकडून खेळण्यास सुरुवात केली. पुढे त्याने १९ वर्षांखालील पंजाब संघाकडून खेळताना हिमाचल प्रदेशविरुद्ध १३७ धावांची शतकी खेळी केली होती, तर त्याने बिहारविरुद्धच्या १९ वर्षांखालील कूच बिहार ट्रॉफीत ३५८ धावांची मोठी खेळी केली होती.

१९९६–९७च्या ओडिसाविरुद्धच्या रणजी ट्रॉफी सामन्यातून युवीने प्रथम श्रेणीत पदार्पण केले होते. त्यानंतर १९९९–२००० साली त्याने हरियाणाविरुद्ध १४९ धावा करत आपले कौशल्य दाखवून दिले. युवीचे भारतीय वनडे संघात पदार्पण चॅम्पियन्स ट्रॉफी या मोठ्या स्पर्धेतून झाले. २००० साली केनियाविरुद्धच्या सामन्यातून त्याने पदार्पण केले, खरे पण त्याला यात खेळण्याची संधी मिळाली नव्हती, पण ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्यपूर्व सामन्यात त्याने ८० चेंडूत ८४ धावा केल्या. त्या वेळी ऑस्ट्रेलिया संघातील दिग्गज गोलंदाजाविरुद्ध खेळताना त्याने ही आक्रमक खेळी केली होती. त्यामुळे त्याला सामनावीराचा पुरस्कार मिळाला होता.

२००२सालच्या नेटवेस्ट मालिकेतील अंतिम सामन्यामुळे युवीच्या क्रिकेट कारकिर्दीला वळण मिळाले. या सामन्यात इंग्लंडविरुद्ध युवीने ६३ चेंडूत केलेल्या ६९ धावांमुळे भारताने दोन विकेट्सने तो सामना जिंकला होता. २००३च्या विश्वचषकातील युवीच्या दोन अर्धशतकांमुळे भारत ढाका येथील बांगलादेश दौऱ्यावर गेला होता. त्यावेळी युवीने ८५ चेंडूत नाबाद १०२ धावांची शतकी खेळी केली होती. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकरनंतर युवी हा दुसरा भारतीय क्रिकेटपटू होता, ज्याने यॉर्कशायर या काउंटी संघाकडून क्रिकेट खेळले आहे. हा असा सन्मान आहे जो खूप कमी खेळाडूंना मिळतो.

२००७च्या आयसीसी टी२० विश्वचषकात युवीने अनेक विक्रम केले. मर्यादित षटकांच्या या क्रिकेटमध्ये इग्लंडविरुद्ध युवीने अवघ्या १२ चेंडूत सर्वात जलद अर्धशतक करण्याचा विक्रम केला होता. हा विक्रम आजही त्याच्या नावावर कायम आहे. तर याच सामन्यात त्याने स्टुअर्ट ब्रॉडच्या गोलंदाजीवर मैदानाच्या सर्व दिशांमध्ये एका षटकात ६ षटकार मारले होते. असा कारनामा ट्वेंटी२० क्रिकेटमध्ये पहिल्यांच कोणत्या फलंदाजाने केला होता. तर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य फेरीत त्याने ३० चेंडूत ७० धावा करण्याचा पराक्रम केल्याने त्याला सलामीवीर पुरस्कार देण्यात आला होता. पुढे भारतात झालेल्या या २०११ विश्वचषक विजयाचा शिल्पकार ठरलेला युवराजने या स्पर्धेत आपल्या उत्कृष्ट कामगिरीने सर्वांची मने जिंकली होती. युवीने त्याच्या कॅन्सरशी दोन हात केल्यानंतर युविकॅन एनजीओचा सुरुवात केली. **(साभार : इंटरनेट)**


### क्लिक...क्लिक...!



**मुरुड : तालुक्यात यंदा झाला असुन नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासूनच शेतकरी रब्बी पेरणीपूर्व मशागतीच्या कामाला लागले आहेत.**

## आरोग्य प्रहर

# डेंटिस्ट सांगतात तीन उपाय, दात होतील पांढरेशुभ्र-दुखणंही कमी



दातांमुळे तुमच्या पर्सनॅलिटीवरही परिणाम होत असतो. दात चांगले स्वच्छ दिसावेत यासाठी बरेच लोक दिवसातून दोन वेळा ब्रश करतात, पण व्यवस्थित ब्रश करूनही दातांवर चांगला परीणाम दिसत नाही. काही सोपे उपाय करून तुम्ही चमकदार दात मिळवू शकता. क्लोव्ह डेंटलच्या डेंटिस्ट डॉ. शिल्पी कौर यांनी याबाबत अधिक माहिती दिली आहे. दात स्वच्छ ठेवण्यासाठी आणि दातांवर चमक आणण्यासाठी काय करावं, काय करू नये ते समजून घ्यायला हवं.

डॉ. शिल्पी कौर यांनी सांगितले की, मीठ आणि तेल मिसळून दातांवर रगडून घ्या. जुन्या काळात काही लोक हा उपाय करत असत. तुम्ही रेग्युलर काही दिवस हा उपाय केल्यास दातांवरील इनॅमल निघून जाईल. दातांवर मीठ आणि तेल घाला. बेकींग सोड्याचा वापर दातांवर कधीच करू नका. यामुळे दात अधिकच खराब होऊ शकतात.

एप्पल वूड डेंटलच्या रिपोर्टनुसार हा उपाय केल्यानं तोंडाचा दुर्गंध येत नाही, तोडांची पीएच लेव्हल मेंटेन राहते. हिरड्यांमधून रक्त येण्याचा त्रास थांबतो, रेस्पिरेटरी इन्फेक्शन्स होत नाहीत. डॉ. सांगतात की, दातांच्या पिवळेपणाचे कारण बॅक्टेरिया, फंगस हे आहे. दात व्यवस्थित स्वच्छ न केल्यामळे दातांना ही कीड लागते आणि दातांमध्ये कॅव्हिटीज तयार होतात. हा एक सोपा उपाय आहे. कोमट पाण्यात मीठ घालून पाण्याने गुळण्या करा. यामुळे दात आणि हिरड्यांना बॅक्टेरियाजपासून मुक्ती मिळेल.

दातांचा पिवळेपणा घालवण्यासाठी तुम्ही ऑईल पुलिंगची मदत घेऊ शकता. ऑईल पुलिंग करण्यासाठी कोणतंही तेल घ्या आणि तोंडात घाला तेल घश्यात जाऊ न देता तोंडाच्या चारही बाजूंना फिरवा. यासाठी तुम्ही नारळाच्या तेलाचा वापर करू शकता. नारळाचे तेल बॅक्टेरियाज आणि दातांची कॅव्हिटी काढून टाकण्यास मदत करते.

हा केमिकली ट्रिटेट उपाय आहे. म्हणजेच हायड्रोजन पेरॉक्साईड एक केमिकल आहे जे दातांवर घासावं लागतं. यात नॅच्युरल ब्लिचिंग एंजंट असतात आणि दातांतील बॅक्टेरिया वाढतात याशिवाय दात स्वच्छ दिसू लागतात.

फास्ट फूड, जंक फूड खाऊ नका. फळांमध्ये संत्र्याचे सेवन करा. संत्री, स्ट्रॉबेरी, ब्लुबेरी या पदार्थांचा आहारात समावेश करा. अशा प्रकारे तुम्ही तुमचे दात चमकवू शकता, शिवाय दुखणे असेल तर तेही बंद होईल.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# हमरापूर गावात रस्ता काँक्रीटीकरणाचा शुभारंभ

## आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन ▌ वरेडी फाटा ते वरेडी मार्गासाठी ५० लाखांचा निधी



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील हमरापुर गावातून जाणाऱ्या वरेडी फाटा ते वरेडी रस्ता सिमेंट काँक्रीटीकरणासाठी जिल्हा नियोजन निधीतून ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्या कामाचे भूमिपूजन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास उद्योजक राजू पिचिका, सरपंच राकेश दाभाडे, उपसरपंच ओंकार पाटील, संजय पाटील, माजी सरपंच प्रदीप म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य रवींद्र शेजवळ, युवराज म्हात्रे, पूजा पाटील, पायल सुर्वे, भाग्यश्री पाटील, प्रतीक्षा चव्हाण, सायली मांडलेकर, ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष दाभाडे, शरद मांडलेकर, दिलीप म्हात्रे, अण्णा दाभाडे, प्रकाश पा. भगत, किशोर पाटील, सचिन पाटील, सचिन गोलीमडे, कुणाल पाटील, सतीश पाटील, आणि महेंद्र पाटील, अतुल भगत, राजू भगत, संजय नाईक, संतोष भगत आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी अंतोरा धरणावर पूल बांधण्यात येत असल्याने पेण व हमरापूर परिसरातील अंतर कमी होणार असून यापुढे सापोली मार्गे पेणला जाणे सोयीचे होणार आहे. त्यामुळे येथील रस्ता होण्यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

## नेरळ नगर परिषदेसाठी आमदार रवींद्र चव्हाणांकडून

# मुख्यमंत्र्यांच्या भेटीचे आश्वासन



**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ ग्रामपंचायतीचे नगर परिषदमध्ये रुपांतर व्हावे. यासाठी भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी यांनी राज्याचे माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली. नेरळमधील वाढते नागरीकरण लक्षात घेवून नेरळ प्रश्नी मुख्यमंत्री यांची भेट घडवून देण्याचे आश्वासन रवींद्र चव्हाण यांनी नेरळ ग्रामस्थांना दिले.

नेरळ ग्रामपंचायतीचे नगर परिषदमध्ये रुपांतर व्हावे यासाठी नेरळ गावात सह्यांची मोहीम घेण्यात आली होती. तर नेरळ ग्रामपंचायतीचे ग्रामसभेत नगरपरिषद व्हावी म्हणून अनेक ठराव घेण्यात आले आहेत. या प्रश्नावर लक्ष वेधण्यासाठी नेरळ भारतीय जनता पक्षाचे वतीने राज्याचे माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांची भेट घेण्यात आली. नेरळ ग्रामस्थ आणि भाजप नेरळ शहर यांनी रवींद्र चव्हाण यांची भेट घेतल्यावर नेरळ ग्रामस्थांनी नेरळ नगर परिषद व्हावी म्हणून घेतलेल्या सह्यांच्या निवेदनाची प्रत चव्हाण यांना देण्यात आली.

नेरळ ग्रामपंचायत ऐवजी शासनाच्या नगरविकास विभागाची यंत्रणा असावी, अशी भूमिका आपलीदेखील आहे. या विषयाशी संबंधित विभागाचे मंत्री अद्याप राज्य सरकार मध्ये नाहीत आणि त्यामुळे नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांच्या मागणीला योग्य न्याय देण्यासाठी संबंधित मंत्री यांच्यासोबत हा विषय मांडण्याची जबाबदारी आपली आहे तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नेरळ नगर परिषद मागणीचे निवेदन देण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नागपूर येथे अधिवेशन काळात यावे. नागपूर येथे नेरळ ग्रामस्थांचा भाजप कडून आलेला विषय राज्याचे मुख्यमंत्री यांच्यासमोर मांडण्याची जबाबदारी आपली आहे, असे आश्वासनदेखील रवींद्र चव्हाण यांनी मुंबई येथील शासकीय निवासस्थानी दिले.

रवींद्र चव्हाण यांच्या भेटीचे वेळी भाजप रायगड जिल्हा चिटणीस मंगेश म्हसकर, कर्जत तालुका मंडल अध्यक्ष राजेश भगत, भाजप कर्जत तालुका उपाध्यक्ष नरेश मसणे तसेच भाजप नेरळ शहर अध्यक्ष संभाजी गरुड, नेरळ शहर महिला अध्यक्ष श्रद्धा कराळे, भाजप नेरळ जिल्हा परिषद गट अध्यक्ष संतोष धुळे, जेष्ठ कार्यकर्ते प्रकाश पेमारे, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य राजन लोभी, नरेंद्र कराळे आदी उपस्थित होते.

**खालापूर :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटाच्या पायथ्याशी असलेल्या ढेकू गावाच्या हद्दीतील फुडमॉलजवळ मुंबई कडे जाणाऱ्या कंटेनरच्या केबीनला शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. खोपोली नगरपालिकेची अग्निशमन दल घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवले. या घटनेत कोणत्याही प्रकारची जीवीतहानी झाली नसली तरी चालकाची केबीन जळून खाक झाली. ही घटना खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली.



## वाहनांवर कारवाई

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत असणाऱ्या वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि.१०) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या ३१९ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करून त्यांच्याकडून दोन लाख ९० हजार ७०० रुपये दंड वसूल केला.


### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्रीनाथ हर्षनाथ शुक्ला व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 33657767977), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/२८२<br>खाते क्रमांक : १४९९ | १ | ०.०५.३०<br>पो.ख. ०.००.८० | ०.७७ |
| | | एकुण ०.०६.१० | |

**एकुण क्षेत्र ०.०६.१० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/१२/२०२४

सही/-
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **आशा नारायण ठाकूर व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 18436801304), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/२८६<br>खाते क्रमांक : ४६५ | १ | ०.१०.६०<br>पो.ख. ०.०१.५० | १.५० |
| | | एकुण ०.१२.१० | |

**एकुण क्षेत्र ०.१२.१० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/१२/२०२४

सही/-
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **रमण राघव ठाकूर व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 17132714647), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/२८१<br>खाते क्रमांक : ८३७ | २ | ०.१०.६०<br>पो.ख. ०.०१.५० | १.५० |
| | | एकुण ०.१२.१० | |

**एकुण क्षेत्र ०.१२.१० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/१२/२०२४

सही/-
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **ठकीबाई मणीलाल म्हात्रे व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 15083708622), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/२४१ /अ<br>खाते क्रमांक : ४२६ | २ | ०.२९.७०<br>पो.ख. ०.०५.६० | ४.२५ |
| | | एकुण ०.३५.३० | |

**एकुण क्षेत्र ०.३५.३० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/१२/२०२४

सही/-
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते की, आमचे अशिल मे. सांवरिया ग्रुप तर्फे भागीदार १) श्री. श्यामसुंदर डाड २) श्रीमती कोमल डाड, दोघे सज्ञान, भारतीय, ऑफीस - शॉप नं. २, भुखंड क्र. १५९, सांवरिया को.ऑ.हौ. सोसायटी, सेक्टर २५, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६, यांनी खालील वर्णनाचा भुखंड व त्यामधील त्यांचा ५० टक्के अविभाज्य हिस्सा भुखंड मालक श्रीमती भारती विश्वनाथ मुकादम, सज्ञान, राहणार मु. कोंबडभुजे, पो. उलवे, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६, यांचेकडून विकत घेतला आहे. सदर भुखंड आमचे अशिल त्रिपक्षीय करारनाम्याव्दारे हस्तांतरण करून घेत आहेत.

**भुखंड मिळकतीचे वर्णन**

| नोड | सेक्टर क्र. | भुखंड क्र. | क्षेत्र चौ. मी. |
|---|---|---|---|
| पुष्पक (वहाळ) | २५ ए | ४० | १५० |

**वरील एकूण भुखंडापैकी ५० टक्के हिश्श्याचा भुखंड म्हणजेच अंदाजे ७५ चौ. मी. चे भुखंडाचा हस्तांतरणाचा व्यवहार**

तरी सदर भुखंड मिळकतीमधील सदर मालकाचे अधिकार पूर्णपणे निर्धोक व निजोखमी असून, त्यामधील हक्क तबदील करण्याचा व सदर भुखंडाची हवी तशी विल्हेवाट लावण्याचा सदर विद्यमान मालकांना पूर्ण अधिकार आहे. अशी खात्री त्यांनी आमचे अशिलांस दिली आहे.

तरी कोणाही व्यक्ती/व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थांचे सदर भुखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचा दावा, हरकती सदर मिळकतीवर व त्यामधील कोणत्याही भागावर कोणाचा गहाण, दान, बक्षीस, लीज, पोटगी, जप्ती, कुळवहीवाट, विश्वस्त, वारसाहक्क, ताबा, देखभाल, साठेकरार, बयाणा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार असलेल्या व्यक्तींनी व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपला हक्क, हितसंबंध व अधिकाराचे लेखी पुरावे व कागदपत्रांसहीत खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. अन्यथा मुदतीत कोणाचीही काही हरकत, तक्रार व दावा वगैरे न आल्यास सदरहू भुखंडाच्या ५० टक्के हस्तांतरणाची प्रक्रीया पूर्ण करण्यात येईल. वरील मालकांचे अधिकार निर्वेध व बोजारहीत आहेत, असे समजण्यात येईल व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत व तक्रार नाही असे समजण्यात येईल. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती / तक्रारी रद्दबातल समजून त्यांचा विचार करण्यात येणार नाही.

दिनांक: ११/१२/२०२४

सही /
**ॲड. प्रशांत मनोहर भोईर**

पत्ता-१०५,अनन्या क्रिस्टल, प्लॉट नं. ३९५, सेक्टर २४, उलवे, नवी मुंबई ४१०२०६ मो. ९९६७३४३६९७, ८६५५५३०७७७



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते की, आमचे अशिल मे. सांवरिया ग्रुप तर्फे भागीदार १) श्री. श्यामसुंदर डाड २) श्रीमती कोमल डाड, दोघे सज्ञान, भारतीय, ऑफीस - शॉप नं. २, भुखंड क्र. १५९, सांवरिया को.ऑ.हौ. सोसायटी, सेक्टर २५, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६, यांनी खालील वर्णनाचा भुखंड व त्यामधील त्यांचा ५० टक्के अविभाज्य हिस्सा भुखंड मालक श्री. त्रिभुवन जैतू जायस्वाल, सज्ञान, राहणार मु. कोंबडभुजे, पो. उलवे, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६, यांचेकडून विकत घेतला आहे. सदर भुखंड आमचे अशिल त्रिपक्षीय करारनाम्याव्दारे हस्तांतरण करून घेत आहेत.

**भुखंड मिळकतीचे वर्णन**

| नोड | सेक्टर क्र. | भुखंड क्र. | क्षेत्र चौ. मी. |
|---|---|---|---|
| पुष्पक (वहाळ) | २५ ए | ३९ | १४० |

**वरील एकूण भुखंडापैकी ५० टक्के हिश्श्याचा भुखंड म्हणजेच अंदाजे ७० चौ. मी. चे भुखंडाचा हस्तांतरणाचा व्यवहार**

तरी सदर भुखंड मिळकतीमधील सदर मालकाचे अधिकार पूर्णपणे निर्धोक व निजोखमी असून, त्यामधील हक्क तबदील करण्याचा व सदर भुखंडाची हवी तशी विल्हेवाट लावण्याचा सदर विद्यमान मालकांना पूर्ण अधिकार आहे. अशी खात्री त्यांनी आमचे अशिलांस दिली आहे.

तरी कोणाही व्यक्ती/व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थांचे सदर भुखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचा दावा, हरकती सदर मिळकतीवर व त्यामधील कोणत्याही भागावर कोणाचा गहाण, दान, बक्षीस, लीज, पोटगी, जप्ती, कुळवहीवाट, विश्वस्त, वारसाहक्क, ताबा, देखभाल, साठेकरार, बयाणा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार असलेल्या व्यक्तींनी व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपला हक्क, हितसंबंध व अधिकाराचे लेखी पुरावे व कागदपत्रांसहीत खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. अन्यथा मुदतीत कोणाचीही काही हरकत, तक्रार व दावा वगैरे न आल्यास सदरहू भुखंडाच्या ५० टक्के हस्तांतरणाची प्रक्रीया पूर्ण करण्यात येईल. वरील मालकांचे अधिकार निर्वेध व बोजारहीत आहेत, असे समजण्यात येईल व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत व तक्रार नाही असे समजण्यात येईल. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती / तक्रारी रद्दबातल समजून त्यांचा विचार करण्यात येणार नाही.

दिनांक: ११/१२/२०२४

सही /
**ॲड. प्रशांत मनोहर भोईर**

पत्ता-१०५,अनन्या क्रिस्टल, प्लॉट नं. ३९५, सेक्टर २४, उलवे, नवी मुंबई ४१०२०६ मो. ९९६७३४३६९७, ८६५५५३०७७७



### जाहीर निविदा
**ग्रामपंचायत खरीवली, ता. खालापूर, जि. रायगड**

सर्व बांधकाम ठेकेदार यांस जाहीर निविदाद्वारे कळविण्यात येते कि, ग्रामपंचायत खरीवली, ता. खालापूर, जि. रायगड यांजकडून १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत कामाच्या अनुभवी इच्छुक जीएसटीधारक ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ज्या ठेकेदारांना सदरची कामे करावयाची आहेत त्यांनी आपली निविदा दि. १२/१२/२०२४ पासून १६/१२/२०२४ पर्यंत ठिक स. ११:०० वा. वाजेपर्यंत समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावीत व सदर निविदा दि. १७/१२/२०२४ रोजी ठीक : ११.३० वा. मा. सरपंच, सदस्य, ठेकेदार यांच्या उपस्थितीत समक्ष उघडण्यात येतील कोणतीही एक अगर सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | सन | अंदाजपत्रकीय रक्कम | योजनेचे नाव | इसारा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कचरा व्यवस्थापन उपकरणे | २०२४/२५ | १०००००/- | १५ वा वित्त आयोग | १०००/- | ३ महिने |
| २ | रस्त्यांची देखभाल दुरुस्ती | २०२४/२५ | १००००/- | १५ वा वित्त आयोग | १००/- | ३ महिने |
| ३ | इमारतीची दुरुस्ती/बांधकाम ग्रामपंचायत | २०२३/२४ | १०००००/- | १५ वा वित्त आयोग | १०००/- | ३ महिने |
| ४ | ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती करणे. | २०२२/२३ | २०००००/- | १५ वा वित्त आयोग | २०००/- | ३ महिने |
| ५ | कंरबेळी ठाकूरवाडीयेथे बोरिंग मारून नळपाणी पुरवठा योजना तयार करणे. | २०२२/२३ | १७९१११/- | १५ वा वित्त आयोग | १७९१/- | ३ महिने |
| ६ | कंरबेळी बौद्धवाडी विहीर दुरुस्ती करणे | २०२२/२३ | १०००००/- | १५ वा वित्त आयोग | १०००/- | ३ महिने |
| ७ | पिण्याच्या पाण्याच्या पाईपची दुरुस्ती | २०२४/२५ | १५००००/- | १५ वा वित्त आयोग | १५००/- | ३ महिने |
| ८ | ग्रा.प. हद्दीतील सर्व शाळांचे लाईट बिल भरणे. | २०२२/२३ | ५००००/- | १५ वा वित्त आयोग | ५००/- | ३ महिने |
| ९ | संगणक व प्रिंटर खरेदी | २०२४/२५ | १००००/- | १५ वा वित्त आयोग | १००/- | ३ महिने |
| १० | पथदिवे बसविणे | २०२४/२५ | १००००/- | १५ वा वित्त आयोग | १००/- | ३ महिने |
| ११ | सोलर दिवे बसविणे | २०२४/२५ | १००००/- | १५ वा वित्त आयोग | १००/- | ३ महिने |
| १२ | राखीव भिंत बांधणे व कुंपणाचे काम | २०२४/२५ | १०००००/- | १५ वा वित्त आयोग | १००/- | ३ महिने |
| १३ | सौरऊर्जा स्थापन | २०२४/२५ | १०००००/- | १५ वा वित्त आयोग | १००/- | ३ महिने |
| १४ | Drainage वाहिनींची दुरुस्ती | २०२४/२५ | १५००००/- | १५ वा वित्त आयोग | १५००/- | ३ महिने |
| १५ | गोहे येथे पाणी पुरवठा योजना तयार करणे. | २०२२/२३ | ३६००००/- | पं.स.सेस फंड | ३६००/- | ३ महिने |

**अटी व शर्ती :-**

१) सदर कामाची कोरी निविदा दि. १२/१२/२०२४ ते १६/१२/२०२४ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध होतील.
२) निविदेसोबत एक टक्का इसारा रक्कम ग्रामपंचायत खरीवली या नावाने डिमांड ड्राफ्ट स्वरुपात भरल्याची पावती जोडणे आवश्यक आहे.
३) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराला ५००/- रूपयाच्या बाँड पेपरवर करारनामा करून घ्यावा लागेल.
४) सदरचे काम पंचायत समितीकडील संबंधित तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीच्या देखरेखीखाली पूर्ण करावयाचे आहे.
५) काम पूर्ण झाल्यानंतर कामाच्या बिलातून ५ टक्के रॉयल्टि सुरक्षा अनामत ५ टक्के विक्रीकर २ टक्के आयकर करावर ०.१५ टक्के सेवा कर व १ टक्का मजूर विमा कामगार कल्याण सेस १ टक्का इत्यादी रक्कमा कपात केल्या जातील.
६) ठेकेदार जीएसटी धारक करणे आवश्यक आहे.
७) सुरक्षा अनामत रक्कम कामाचा दर्जा पाहून ६ महिन्याने परत केली जाईल.
८) कामाचे वेळी काही जीवितहानी झाल्यास जबाबदारी ठेकेदाराची राहील.
९) काम सुरू करण्यापूर्वीचे फोटो काम सुरू असतानाचे फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो सादर केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही.
१०) पोस्टाने आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाही.

सही /-
**ग्रामसेवक**
ग्रुप ग्रामपंचायत खरीवली
ता. खालापूर, जि. रायगड

सही /-
**सरपंच**
ग्रुप ग्रामपंचायत खरीवली
ता. खालापूर, जि. रायगड

# खारघर, पनवेलमध्ये महापालिकेची अतिक्रमण विभागातर्फे तोडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने अतिक्रमण विभागांतर्गत प्रभाग कार्यालयाच्यावतीने गेल्या दोन दिवसापासून खारघर, पनवेलमध्ये अनधिकृतपणे रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाल्यांवर आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार तोडक कारवाई करण्यात येत आहे. फूटपाथवर तसेच रस्त्यांवरील वाढत्या अतिक्रमणामुळे महापालिकेच्या वतीने ही कारवाई करण्यात आली.



पनवेलमधील रायगड बाजार मार्केट यार्ड येथे भाजी खरेदी विक्री करणाऱ्यांची गर्दी कायम असते तसेच नागरिकांची व किरकोळ भाजी विक्रेत्यांची खरेदी करण्यासाठी येजा सुरू असते. अशावेळी रस्त्यांच्या कडेला अनधिकृतरित्या फळ विक्री व भाजी विक्री करणाऱ्या व्यवसायिकांमुळे सर्वसामान्यांना चालणे कठिण होऊन जाते. त्यामुळे महापालिकेच्या वतीने अनधिकृत व्यवसायिकांवरती महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्यावतीने कारवाई करण्यात आली. तसेच मार्केट यार्डमधील रस्त्याच्या कडेला अनधिकृतरित्या बांधलेल्या शेडवर तोडक कारवाई करण्यात आली.

याच पध्दतीने नवीन पनवेलमधील गणेश मार्केट येथे अतिक्रमणामुळे नागरिकांना रस्त्यांवरून जाण्यायेण्यास त्रास होत असल्याने आयुक्त मंगेश चितळे यांनी अतिक्रमणावरती कडक कारवाई करण्याचे आदेश प्रभाग कार्यालयास दिले होते. त्यानूसार १० डिसेंबर रोजी नवीन पनवेलमधील गणेश मार्केट परिसरातील फुटपाथवरील अनधिकृत उभारलेल्या टपऱ्यांवरती अतिक्रमण विभागाच्यावतीने तोडक कारवाई करण्यात आली.

खारघरमध्ये सेक्टर १९ मध्ये फुटपाथवरील अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांवरती, त्यांच्या शेडवरती अतिक्रमण विभागाच्यावतीने तोडक कारवाई करण्यात आली. प्रभाग समिती क कामोठे अंतर्गत फुटपाथवरील अनधिकृत व्यवसायिकांवर कारवाई करून सामान जप्त करण्यात आले.

यापुढेही अतिक्रमण विभागाकडून कारवाई होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

> **पनवेल शहरात रस्त्यांवर तसेच फूटपाथवर अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्यांवर प्रभाग ड अतिक्रमण विभागाच्यावतीने कडक कारवाई केली जात आहे. फेरीवाल्यांनी रस्त्यांवर अनधिकृत व्यवसाय करू नये अन्यथा येत्या दिवसांमध्ये अशा अतिक्रमणांविरोधातील कारवाई तीव्र करण्यात येईल.**
>
> **-डॉ. रूपाली माने, सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग ड**

# माझे पसंतीचे सिडकोचे घर योजनेच्या ऑनलाईन अर्ज नोंदणीस मुदतवाढ

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोच्या माझे पसंतीचे सिडकोचे घर या २६ हजार घरांच्या महागृहनिर्माण योजनेने १ लाख अर्जांचा विक्रमी टप्पा गाठला आहे. सुरुवातीपासूनच नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळालेल्या या योजनेने लोकप्रियतेचा उच्चांक गाठल्याचे हे द्योतक आहे. नागरिकांच्या विनंतीस मान देऊन या योजनेकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्यासाठी २६ डिसेंबर २०२४ पर्यंत ही अंतिम मुदत देण्यात आली आहे.

अंतिम मुदत संपुष्टात येईपर्यंत नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद कायम राहणार असल्याचा विश्वास सिडकोने व्यक्त केला आहे. तसेच एक लाख अर्जांचा टप्पा म्हणजे, सिडकोच्या गृहनिर्माण क्षेत्रातील योगदानाचा व विश्वसार्हतेचा जनतेने केलेला गौरव असल्याची प्रतिक्रियाही सिडकोने दिली आहे.

सिडकोतर्फे १२ ऑक्टोबर २०२४ रोजी दसऱ्याच्या मुहूर्तावर माझे पसंतीचे सिडकोचे घर या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला होता. या योजनेंअंतर्गत २६,००० सदनिका प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटाकरिता विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नवी मुंबईतील वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर (प), खारघर (पू) (तळोजा), मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि कळंबोली नोडमध्ये या सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या योजनेद्वारे सर्वसामान्य नागरिकांना नवी मुंबईमध्ये आपल्या हक्काचे व परवडणाऱ्या दरातील घर घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली असून परिपूर्ण पायाभूत सुविधा, कनेक्टिव्हिटी, दर्जेदार बांधकाम आणि नवी मुंबईतील समृद्ध जीवनशैली अनुभवण्याची संधी नागरिकांना या योजनेद्वारे लाभली आहे.

अधिकाधिक नागरिकांना योजनेकरिता अर्ज करता यावा व अर्जदारांना आवश्यक त्या कागदपत्रांची जमवाजमव करता यावी याकरिता योजनेच्या अर्ज नोंदणीस २६ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच नोंदणी करताना बारकोड असलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करण्याची आणि १०० किंवा ५०० रु. मूल्याच्या स्टॅम्पपेपरवर नोटरीकृत प्रतिज्ञापत्र सादर करण्याची अटही या पूर्वीच शिथील करण्यात आली आहे. यामुळे अधिकाधिक नागरिकांना सुरळीतपणे नोंदणी करता आली.

आता या योजनेची इकेवायसी नोंदणी दिनांक २६ डिसेंबर २०२४ पर्यंत करता येईल. यासाठी सिडकोतर्फे cidcohomes.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले असून नोंदणी प्रक्रिया तथा योजनेविषयी अतिरिक्त माहिती प्राप्त करण्यासाठी ९९३०८७०००० हा संपर्क क्रमांक देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे. सिडकोच्या अधिकृत समाजमाध्यमांवरून देखील वेळोवेळी या योजनेची अद्ययावत माहिती प्रसिद्ध केली जाते.

# ५० लाखांच्या अपघाती विम्याची बँक ऑफ इंडियाकडून पूर्तता

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बँक ऑफ इंडिया नवी मुंबई विभागाचे विभागीय व्यवस्थापक अतुल सातपुते यांनी बुधवारी (दि.११) बँक ऑफ इंडिया सरकारी वेतन खात्याचा ५० लाख रुपयांचा अपघाती मृत्यू विमा दाव्याचा धनादेश स्वर्गीय मधुकर वेखंडे यांच्या पत्नी माधुरी वेखंडे यांना सुपूर्द केला.

कै. मधुकर वेखंडे हे ठाणे जिल्हा परिषदेच्या शहापूर येथील शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांचे नुकतेच अपघाती निधन झाले. त्यांचे वेतनखाते हे बैंक ऑफ इंडिया, शहापूर शाखे मध्ये चालू होते. बँक ऑफ इंडियातर्फे सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना वेतनखात्याला सुमारे ५० लाख रुपयांचा वैयक्तिक अपघात विमा लागू आहे.

जिल्हा परिषद शाळेच्या कर्मचारी व वेखंडे कुटुंबियांच्या वतीने बँकच्या कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ५० लाख रकमेचा धनादेश बँक ऑफ इंडिया नवी मुंबई विभागाचे विभागीय व्यवस्थापक अतुल सातपुते आणि शहापूर शाखा व्यवस्थापक पल्लवी निळे यांच्या उपस्थितीमध्ये देण्यात आला.

धनादेश दिल्याबद्दल माधुरी वेखंडे यांनी बँक ऑफ इंडियाचे आभार मानले.



# तालुका कृषी विभागाची वनराई बंधारे बांधण्याची मोहीम सुरू

**उरण : वार्ताहर**

उरण तालुका कृषी विभागामार्फत तालुका कृषी अधिकारी ऋतुजा नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या निसर्गरम्य अक्कादेवी धरण परिसरातील ओढ्यांवर रविवार (दि.८) रोजी, श्री महागणपती सेंद्रिय गटातील शेतकऱ्यांच्या श्रमदानातून दोन वनराई बंधारे बांधण्यात आले आहेत.



वनराई बंधारे शेतकऱ्यांसाठी आणि पशु पक्षांसाठी वरदान ठरत आहेत. वनराई बंधारे बांधून पाणी अडविले तर या पाण्यामुळे विविध प्रश्न मार्गी लागत असतात. सध्या कृषी विभागामार्फ वनराई बंधारे बांधण्याची मोहीम सुरू झाली असून, तालुक्यात अजून बऱ्याच ठिकाणच्या ओढ्यांवर वनराई बंधारे बांधण्यात येणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी ऋतुजा नारनवर, कृषी सहाय्यक सुरज घरत, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील यांनी दिली. या वेळी शेतकरी संजय पाटील, अनिल केणी, भास्कर ठाकूर, दामोदर मुंबईकर, बाळकृष्ण ठाकूर, समाधान पाटील, विजय म्हात्रे, मिलिंद ठाकूर, मंगेश ठाकूर, शशिकांत ठाकूर, रघुनाथ ठाकूर आदींनी श्रमदानातून बंधारा उभारण्यास सहकार्य केले

पाणी आपले जीवन आहे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जिवंत राहू शकत नाही. पशुपक्षी, झाडे, मानव यांच्यासाठी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. यासाठी पाण्याचे महत्त्व जाणून बंधारा बांधून पाणी अडविले, तर या पाण्याचा वापर गुरांची तसेच जंगली प्राण्यांची तहान भागवण्यासाठी करता येईल, असे तालुका कृषी अधिकारी ऋतुजा नारनवर यांनी सांगितले.

> **सिमेंटच्या गोणीमध्ये माती भरून प्रवाह असलेल्या ठिकाणी माती भरलेल्या गोणी एकावर एक रचून ठेवल्यास काही महिने पाणी या ठिकाणी जमा होऊन भूजल पातळी वाढण्यास मदत होते.**
>
> **-सुरज घरत, कृषी सहाय्यक अधिकारी**

# इटीसी केंद्रातील दिव्यांग विद्यार्थ्यांना वंडर्स पार्कची सैर

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका इटीसी अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्राद्वारे दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून ०३ डिसेंबर म्हणजेच जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून डिसेंबर महिन्यामध्ये समाजामध्ये दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करणे तसेच दिव्यांग मुलांना प्रोत्साहित करणे या हेतूने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.



या अनुषंगाने ३ डिसेंबर २०२४ रोजी दिव्यांगात्वाबाबत जनजागृतीकरिता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. याच धर्तीवर ९ डिसेंबर रोजी इटीसी केंद्रातील सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांनी वंडर्स पार्क, नेरूळ येथे भेट दिली. यावेळी दिव्यांग मुलांनी आपल्या पालकांच्या उपस्थितीत वंडर्स पार्क येथील वेगवेगळ्या खेळांचा आणि टॉय ट्रेनचा आनंद घेतला.

भेटीचे संपूर्ण नियोजन ईटीसी केंद्राद्वारे केंद्र संचालिका तथा उपायुक्त संघरत्ना खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या वेळी ईटीसी केंद्रातील विशेष शिक्षक, निमवैद्यकीय कर्मचारी असा संपूर्ण कर्मचारीवर्ग मुलांसोबत उपस्थित राहून मुलांची सुरक्षितता आणि त्यांना खेळाचा आनंद मिळावा याकरिता दक्ष होते. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आयुक्त डॉ.कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनीही दिव्यांग विद्यार्थ्यांना अशा भेटीतून आनंद मिळावा यासाठी पुढाकार घेत कार्यक्रमासाठी मार्गदर्शन केले.

वंडर्स पार्कच्या कर्मचारीवर्गाने दिव्यांग मुलांच्या या भेटीकरता उत्तम सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी मुलांना खाऊ वाटप करण्यात आला.

# चोरी, घरफोडी करणाऱ्यांना कारावास

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रामधील चोरी, घरफोडीच्या सहा गुन्ह्यांमधील आरोपींना न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे. चार जणांवरील आरोप सिद्ध झाले असून, त्यांना ३ ते ६ महिन्यांच्या कारावासाची शिक्षा दिली आहे.

वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या चोरी, घरफोडीच्या दोन घटनांमध्ये रोशन कोकरे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी न्यायालयात आरोप सिद्ध झाले असून, त्याला सहा महिन्यांची कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तसेच सुरेश वैष्णव या संशयिताविरोधातही दोन गुन्हे दाखल झाले होते. त्याच्यावरील गुन्हेही सिद्ध झाले असून, त्याला पाच महिन्यांची साध्या कारावासाची शिक्षा देण्यात आली आहे.

अग्र बिस्टला न्यायालयाने तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. आणखी एका गुन्ह्यात खैरून शेख याला दोषी ठरविले असून, त्याला सहा महिन्यांची शिक्षा सुनावली आहे.

# रयतच्या विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत गव्हाण विद्यालय अव्वल





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत विभागीय स्तरावर घेण्यात येत असलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत रायगड विभागीय स्तरावरील प्रश्नमंजुषा स्पर्धेत संस्थेच्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या गटिने प्रथम क्रमांक पटकावला आणि आपले अव्वल स्थान निर्धारित केले.

संस्थेच्या वतीने दरवर्षी विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानाची हसत खेळत परीक्षा घेण्याच्या दृष्टीने आयोजित करण्यात येत असलेल्या या प्रश्नमंजुषा स्पर्धेत विद्यालय अव्वल स्थानी राहण्याचा सन्मान पुन्हा एकदा गव्हाण विद्यालयाने प्राप्त केला.

प्रश्नमंजुषा स्पर्धेसाठी गव्हाण विद्यालयाच्या दिक्षा रमेश वर्तक (दहावी ब), सारा वैभव घरत (नववी ब) व प्रतिक प्रशांत नाडे (नववी क) या विद्यार्थ्यांच्या गटाने अतिशय चुरशीच्या आणि अटितटिच्या स्पर्धेत आपले अव्वल स्थान निश्चित करून आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखविली.

रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाच्या वतीने विभागीय स्तरावरच्या या स्पर्धा १० डिसेंबर २०२४ रोजी जासई येथील श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये संपन्न झाल्या. या विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत रायगड विभागातील २५ शाळांच्या संघांनी सहभाग नोंदवला.

या वेळी विजेत्या स्पर्धकांना रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहनराव कोंगेरे यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत रोख रक्कम आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून देवेंद्र पाटील, तुषार म्हात्रे व दिनेश भगत यांनी काम पाहिले तसेच संपूर्ण स्पर्धेचे गुणलेखक म्हणून कलाशिक्षक भाले व गणेश भोईर यांनी विशेष काम पाहिले. संस्थेच्या रायगड विभागामध्ये अतिशय मोलाची कामगिरी बजावणारे गव्हाण विद्यालयाचे उपशिक्षक तथा कलाशिक्षक गणेश भोईर यांचाही विशेष सन्मान मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला.

विजेत्या गटातील या तिन्ही स्पर्धकांना विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या शानदार समारंभात विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांचे शुभहस्ते व संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.

या वेळी विद्यार्थी,पालक आणि शिक्षक उपस्थित होते. विद्यालयाच्या यशामध्य मध्ये भर टाकणाऱ्या या प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर तसेच विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांचेसह स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ व नागरिकांच्या वतीने हार्दिक अभिनंदन होत आहे.

या विजेत्या स्पर्धकांबरोबरच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या विद्यालयाच्या प्रश्नमंजुषा विभागाचे प्रमुख द्रौपदी वर्तक व शितलकुमार म्हात्रे यांचेही सर्वत्र कौतुक होत आहे.

# चिरनेर येथील रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

**उरण : वार्ताहर**

पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, आरसी बुक, एटीएम कार्ड, अशी तेरा प्रकारची महत्त्वाची कागदपत्रे व कार्ड तसेच पंधराशे रुपयांची रोख रक्कम असलेली, रस्त्यात पडलेली लेडीज पर्स एका रिक्षा चालकाला सापडली, मात्र ही सापडलेली लेडीज पर्स या रिक्षा चालकाने संबंधित महिलेला परत करून आपला प्रामाणिकपणा दाखविला आहे. त्याच्या या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



चिरनेर येथील रिक्षा चालक श्याम चौलकर हे शुक्रवार (दि.६) डिसेंबर रोजी, पनवेल येथे भाडे घेऊन गेले असता, रात्री साडे आठ वाजण्याच्या सुमारास त्यांना पंचरत्न हॉटेलच्या सर्कल जवळ रस्त्यामध्ये एक लेडीज पर्स पडलेली दिसली. ती त्यांनी उचलून, उघडून पाहिली असता, त्यात महत्त्वाची कागदपत्रे व कार्ड आणि पंधराशे रुपयांची रोख रक्कम असल्याचे दिसून आले.

या दरम्यान चौलकर यांच्या ओळखीचे चिरनेर गावातील संजय परदेशी यांच्याशी भेट झाली. रिक्षा चालक श्याम चौलकर यांनी त्यांना या घटनेची माहिती दिली. या वेळी परदेशी यांनी पर्स मधील कागदपत्रे पाहिल्यानंतर सरगम हरपाल सिंग या महिलेची पर्स असल्याचे त्यामधील कार्डवरून समजले. यासाठी संजय परदेशी यांनी त्यांच्या ओळखीच्या व्हाट्सअप ग्रुपवर या सर्व महत्त्वाच्या कागदपत्रांचे फोटो व्हायरल केले. आणि हरवलेली पर्स परत करण्याचे आवाहन केले. रिक्षा चालक श्याम चौलकर हे घरी आल्यानंतर त्यांनी चिरनेर पोलीस चौकीत असलेल्या पोलीस कॉन्स्टेबल सचिन कडू यांच्याशी संपर्क साधून, त्यांना देखील ही पर्स दाखवली असता, पोलीस कॉन्स्टेबल सचिन कडू यांनी या पर्समध्ये असलेल्या कार्ड वरून सरगम हरपाल सिंग या महिलेबरोबर मोबाईल द्वारे संपर्क साधून, या महिलेला या घटनेची माहिती दिली.

त्यानंतर पनवेल करंजाडे येथे राहणारी ही महिला शनिवार (दि.८) रोजी रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास श्याम चौलकर यांच्या घरी पोहचली. श्याम चौलकर यांनी या महिलेसह चिरनेर पोलीस स्टेशन गाठून, हवालदार श्री गदमले, पोलीस कॉन्स्टेबल सचिन कडू यांना हरवलेली लेडीज पर्स या महिलेची असल्याचे सांगितले. त्यानंतर महिला आणि कागदपत्रांवरील छायाचित्रांची खात्री करून, त्यांच्या समक्ष ही लेडीज पर्स सरगम हरपाल सिंग यांना देऊ केली.

# शिक्षक परिषदेच्या सभेत विविध ठराव मंजूर

## चौथ्यांदा आमदार झाल्याबद्दल संजय केळकर यांचा सत्कार

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग संघटनेच्या राज्य कार्यकारीणीची बैठक नुकतीच पार पडली. बैठकीत प्राथमिक शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा होऊन ठराव संमत झाले. राज्य कार्यकारणीच्या सभेला महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते



प्रामुख्याने जुनी पेन्शन योजना लागु करावी, बदली धोरणातील त्रुटी दूर करावे, २००४ पूर्वी सवेत रुजू झालेल्या शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील त्रुटी दूर कराव्यात, मुख्यालयाचा प्रश्न, निवड श्रेणी संदर्भातील त्रुटी, शिक्षकांकडून बीएलओची कामे, इतर शैक्षणिक कामे पूर्णपणे काढून घ्यावी, अशी मागणी करणारे ठराव मंजुर करण्यात आले.

विद्यार्थ्यांना शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून जुन्या पद्धतीने गणवेश देण्यात यावे, शिक्षणसेवक पद रद्द करावे, अवाजवी उपक्रम व टपाली कामे रद्द करावे, १५ ऑगस्ट २०२४ चा संच मान्यतेचा शासन आदेश रद्द करावा, सातव्या वेतन आयोगातील पदवीधर व वरिष्ठ वेतन श्रेणीतील वेतन त्रुटी दूर कराव्यात, राज्यातील शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना लागू करावी, सर्व विषय शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी सरसकट लागू करावी, शालेय पोषण आहार योजना स्वतंत्र यंत्रणेकडे वर्ग करावी या मागण्यांवर चर्चा करून त्याबाबत आग्रह धरण्यात आला.

संघटनेचे संस्थापक व आमदार संजय केळकर यांची विधिमंडळात चौथ्यांदा निवड झाल्याबद्दल संघटनेच्या राज्यकार्यकारिणीच्या वतीने सभेत त्यांचा सत्कार करण्यात आला. सभेच्या अध्यक्षस्थानी कोकण विभाग पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे होते. पुढील काळात शिक्षकांचे व शिक्षणाचे प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या पाठीशी कायम उभे राहण्याची भूमिका दोन्ही आमदारांनी मांडली.

या सभेला राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, कार्यवाह संजय पगार, कार्यकारी अध्यक्ष बाबुराव गाडेकर, रायगड जिल्हाअध्यक्ष उदय गायकवाड, जिल्हा कार्यवाह विजय पवार, संजय कोंडविलकर, सुधाकर करकरे, स्मिता जोष्टे मॅडम, सुनिल साळवी, महेंद्र गायकवाड, वैभव पिंगळे, सचिन खोपडे, गणेश निजापकर, अमोल केतकर, राजू नाईक, देवांनंद गोगर, रमेश देठे, बाळासाहेब बारगजे आदिंसह राज्यभरातील प्रतिनिधी उपस्थित होते.

# पेण-खोपोली अपघातात पगारे कुटुंब बचावले

**पेण : प्रतिनिधी**

पेण-खोपोली महामार्गावर आंबेघर हद्दीत सोमवारी (दि.९) सकाळी ८:३० वाजण्याच्या सुमारास कारची बाईकला धडक लागून एकाच कुटंबातील तीन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

पेण दिशेने येणाऱ्या पल्सर मोटरसायकल एमएच ०५ बीएल ५७९४ वरून जय बलराज पगारे (वय ३२) हे आपल्या पत्नी इंद्रायणी व लहान मुलगा रिधानसह प्रवास करत होते. या दरम्यान खोपोली बाजूकडून येणाऱ्या सफेद रंगाच्या टाटा कंपनीच्या एमएच ०६ सीडी ५२४० गाडीने त्यांना जोरदार धडक दिली. अपघातात पगारे कुटुंब जखमी झाले

धडक इतकी जोरदार होती की दुचाकीस्वार पगारे, त्यांची पत्नी व मुलगा रस्त्यावर उडाले. याचवेळी समोरुन येणाऱ्या बसच्या चालकाने प्रसंगावधान राखत बस थांबवली, त्यामुळे पगारे कुटुंब मोठ्या अपघातातून बचावले. झाले. पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार पाटील या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.



# विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी मुरूडच्या शिक्षकांचे परिश्रम

**मुरुड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने पथनाट्य, समूहगीत, समूहनृत्य, शिल्पकला अशा विविध स्पर्धांचे मुरुडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली वळके येथे आयोजित करण्यात आल्या होत्या



मुरूडमधील विविध केंद्रात प्रथम क्रमांकाने विजयी ठरलेल्या स्पर्धकांमध्ये तालुकास्तरीय व्यक्तिमत्त्व विकासस्पर्धा घेण्यात आली. दीडशेहून अधिक मुले विविध स्पर्धे साठी लागणारे साहित्य घेऊन, मोठ्या उत्साहाने सहभागी झाली.या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे विजेते जिल्हास्तरावर सहभागी होतील.

या वेळी मांडला केंद्रप्रमुख सुनील पाटील, बोर्ली सुविधा पाटील, नांदगाव दिनेश म्हात्रे, जितेंद्र मकू, संजय झिराडकर, वळके सरपंच प्रिया म्हात्रे, हायस्कूलचे मुख्याध्यापक रमाकांत पाटील, रमेश भगत, राजेंद्र नाईक, देवानंद गोगर, परीक्षक सुरेश मोरे, साधनव्यक्ती प्रवीण भगत, महेश भगत, विश्वनाथ म्हात्रे, संतोष पुकळे, सुनील काळे, जयवंत देडगे, अस्मिता भगत, यांसह तालुक्यातील शिक्षक, पालक उपस्थित होते.

# नेरळ पोलिसांकडून पाच लाखांच्या दागिन्यांच्या चोरीचा गुन्हा उघडकीस

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत पाच लाखाचे दागिने यांची चोरी झाल्याची तक्रार नेरळ पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. या प्रकरणी नेरळ पोलिसांनी साधारण ५० ठिकाणचे सीसीटिव्ही कॅमेरे यांची पाहणी करून चोरट्यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून चोरी झालेला ऐवज हस्तगत केला. त्या सराईत गुन्हेगारांवर नवी मुंबईत १३ तर ठाणे, पालघर, नाशिक अशा ठिकाणीदेखील घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत.



पियुष अपार्टमेंट मध्ये राहणारे शिक्षक संतोष कोळी यांच्या रूमचा दरवाजाला असलेला कुलूप तोडून त्यांच्या घरातील बेडरूममधील लोखंडी कपाटाच्या आतील लॉकर मधून अंदाजे पाच लाख रुपये किमतीचे दागिने लंपास केले होते. सदर गुन्ह्याची नोंद नेरळ पोलीस ठाणेत झाल्यानंतर गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथक तयार करण्यात आले. या पथकाने जाण्या-येण्याचे मार्गावरील ४० ते ५० सीसी.टि.व्ही फुटेज तपासले. त्यांनी केलेल्या अथक प्रयत्नामध्ये त्यांना यश येवून गुन्ह्यातील आरोपी हा भिवंडी येथील राहणारा असल्याचे समजले.

तांत्रिक तपास आणि गोपनीय माहिती काढून आरोपी शफिक उर्फ टोपी अब्दुल शेख, वय ४६ वर्षे, घुंगटनगर, भिवंडी याला ४ डिसेंबर रोजी त्याच्या घरातून अटक केली. गुन्ह्यातील काही मुद्देमाल शफीकने सोने व्यापारी रमेश गोपाल सोनी वय ३६ वर्षे, काळूबाई चौक, डोंबिवली पूर्व, जि.ठाणे याला विक्री केले असल्याचे सांगितले. आरोपीकडून आतापर्यंत १,२९,७००/- रूपये किंमतीचे २६.२०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. आरोपी शफिक उर्फ टोपी अब्दुल शेख याचेविरूध्द यापूर्वी १८ घरफोडी चोरीचे गुन्हे तर रमेश गोपाल सोनी याचेवर सहा चोरीचे मालमत्ता घेण्याचे गुन्हे दाखल आहेत.

नेरळ पोलिसांनी सदर गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डी. डी टेळे यांचे मार्गदर्शन घेवून नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे, पोलीस उपनिरीक्षक संदिप फड, पोलीस हवालदार सचिन वाघमारे, राजेभाऊ केकाण, अनुया बेंद्रे, निरंजन दवणे, विनोद वांगणेकर यांनी उत्कृष्ठ तपास यंत्रणा हाताळून गुन्ह्याची उकल केली आहे.

# विविध योजना नोंदणी जनजागृती शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद हद्दीतील विठ्ठल नगर प्रभागात किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे यांच्या नेतृत्वाखाली दत्तोपंत ठेंगडी राष्ट्रीय श्रमिक शिक्षण व विकास बोर्ड, प्रादेशिक संचालनालय, मुंबई विभाग श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार व महाराष्ट्र महा ई-गव्हर्न भारत सरकार आणि भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा - कर्जत, यांच्या संयुक्त विद्यमाने नोंदणी जनजागृती शिबिर आयोजन करण्यात आले.

मुख्यमंत्र्यांच्या स्तरावरील विविध योजनांचे जनजागृती व विविध शासकीय योजना नाव नोंदणी शिबीर प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे हे आयोजित करत असतात. त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात शिबिर करण्यात आले आहे. या शिबिरात १) ई-श्रम कार्ड २) प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना (पेन्शन योजना) कार्ड ३) स्वानिधीकडून समृद्धी कार्ड ४) विश्वकर्मा योजना कार्ड नाव नोंदणी ५) आयुष्मान भारत कार्ड ६) आभा कार्ड कार्ड ७) एम्प्लॉयमेंट कार्ड (राष्ट्रीय करिअर सेवा योजना) ८) मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना ९) अटल पेन्शन योजना कार्ड १०) राष्ट्रीय पेन्शन योजना कार्ड नोंदणी इ. ११) पोस्ट ऑफिस विमा योजना कार्ड १२) लहान मुलांचे आधार काढून मिळतील (१ ते ५ वर्ष) १३) आधार कार्ड अपडेट करून देण्यासाठी शिबीर आयोजित केले असून या शिबिरात विविध प्रकारचे केंद्रीय व राज्य सरकार योजना नाव नोंदणी करून कार्ड काढून देण्यासाठी मदत केली जात आहे.

या शिबिराचे आयोजन भाजप किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे, भाजप महिला मोर्चा रायगड जिल्हा उपाध्यक्ष स्नेहा गोगटे, दीपक बेहरे, भाजप कर्जत शहर अध्यक्ष विजय जीनगरे, शहर सरचिटणीस सूर्यकांत गुप्ता, शहर युवा मोर्चा अध्यक्ष सर्वेश गोगटे, महिला शहर अध्यक्ष शर्वरी कांबळे, शहर संघटक मिलिंद भोईर, विजय कडू आदी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **बारक्या जयराम डाकी** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 12496670064), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/३३६ खाते क्रमांक : ८३५ | २ | ०.१४.७० पो.ख. ०.०२.०० | २.१२ |
| | | एकुण ०.१६.७० | |

**एकुण क्षेत्र ०.१६.७० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **बळीराम भास्कर ठाकूर व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 12449649781), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/२८७ खाते क्रमांक : ६७४ | २ | ०.२४.८० पो.ख. ०.०३.५० | ३.५६ |
| | | एकुण ०.२८.३० | |

**एकुण क्षेत्र ०.२८.३० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१


# माणगाव अशोकदादा साबळे विद्यालयात तंबाखूमुक्त कार्यशाळा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील लोकनेते अशोकदादा साबळे विद्यालय या ठिकाणी माणगाव गट शिक्षण अधिकारी सुरेखा तांबट यांच्या मार्गदर्शनाखाली (दि.१० ) रोजी तालुकास्तरीय तंबाखूमुक्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये तालुक्यातील सर्व जिल्हा परिषदेचे तसेच खाजगी शाळेचे ७७ मुख्याध्यापक उपस्थित होते.

या कार्यशाळेच्या माध्यमातून सलाम मुंबई फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक, प्रशांत उबाळे यांनी उपस्थित मुख्याध्यापकांना तुमच्या शाळा तंबाखू मुक्त करून विद्यार्थ्यांना तंबाखूच्या विषारी व्यख्यापासून दूर ठेवण्यासाठीचे महत्त्वपूर्ण माहिती दिली. शाळांना तंबाखूमुक्त घोषित करण्यासाठी शासनमान्य नऊ निकषांची पूर्तता करणे अत्यंत आवश्यक आहे. व हे निकष सध्या सोप्या पद्धतीने पूर्वनियोजन करून पूर्ण येतात याबाबतचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन कार्यशाळेच्या माध्यमातून करण्यात आली.




जावक क्रमांक २८२१/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड विभाग,
कल्पतरु इमारत, मुख्य पोस्ट ऑफीस जवळ,
अलिबाग, रायगड, रायगड, रायगड,
दि.११/१२/२०२४ रायगड

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन. क्रमांक: RGD/१४५५१/१८/२४
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांकः ४५८/२४
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक जानकी चॅरिटेबल ट्रस्ट बाबत ।
न्यासाचा पत्ता :- श्री शिल्प, प्लाट नं. २,,रोड नं. ७,सेक्टर १९, नेव पनवेल, वीटीसी, रायगड, पनवेल, पनवेल
अर्जदार :- कृष्णा रामा जोशी,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेतः-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Trustee Fee | ५०००.०० |

**(अ) जंगम मिळकतः रोख रु. ५०००/- मात्र**
(अक्षरी रुपये पाच हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकतः रोख रु. /- मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ११-१२-२०२४ रोजी दिली ।

शिक्का

**सही/-**
**अधिक्षक (प्र)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **पोशा गणपत पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 18811112320), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/३३७ खाते क्रमांक : ८६३ | १ | ०.२८.०० पो.ख. ०.०४.०० | ४.०६ |
| | | एकुण ०.३२.०० | |

**एकुण क्षेत्र ०.३२.०० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक बाबुराव जयराम डाकी यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 29890161240), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/३३० खाते क्रमांक :१०३७ | २ | ०.१५.९० पो.ख. ०.०२.३० | २.३१ |
| | | एकुण ०.१८.२० | |

**एकुण क्षेत्र ०.१८.२० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

# भारताच्या लेकीने घडवला इतिहास

## नीलम भारद्वाजच्या १३७ चेंडूत २०० धावा!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय देशांतर्गत क्रिकेटमध्ये सध्या अनेक स्पर्धा खेळवल्या जात आहेत, ज्यामध्ये सिनियर महिला एकदिवसीय ट्रॉफीचाही समावेश आहे. या स्पर्धेत १८ वर्षांच्या मुलीने इतिहास लिहिला आहे. लिस्ट ए क्रिकेटमध्ये दुहेरी शतक झळकावणारी पहिला फलंदाज ठरली आहे. हा पराक्रम उत्तराखंड आणि नागालँड यांच्यात झालेल्या सामन्यात पाहायला मिळाला.

उत्तराखंडची क्रिकेटपटू नीलम भारद्वाजने भारतीय क्रिकेटमध्ये इतिहास घडवला आहे. लिस्ट ए क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावणारी ती सर्वात तरुण भारतीय महिला फलंदाज ठरली आहे. नागालँडविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात तिने केवळ १३७ चेंडूत २०२ धावांची नाबाद खेळी केली. यादरम्यान नीलमने २७ चौकार आणि २ षटकार लगावले. नीलमने तिसऱ्या क्रमांकावर खेळताना ही ऐतिहासिक खेळी



खेळली. १४७.४५ च्या उत्कृष्ट स्ट्राईक रेटने तिने धावा केल्या. नीलम भारद्वाज ही भारतातील दुसरी खेळाडू आहे जिने लिस्ट ए क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावण्याचा पराक्रम केला आहे.

नीलम भारद्वाजपूर्वी दिल्लीकडून खेळत असलेल्या श्वेता सेहरावतने जानेवारी २०२४ मध्ये नागालँडविरुद्ध द्विशतक झळकावले होते. त्यानंतर श्वेता सेहरावतने १५० चेंडूत २४२ धावांची खेळी केली होती. मात्र काही महिन्यातच नीलम भारद्वाजने हा विक्रम मोडीत काढला आहे.

उत्तराखंडने या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना नीलम भारद्वाजच्या खेळीच्या जोरावर मोठी धावसंख्या उभारली. त्यांनी निर्धारित ५० षटकांत २ गडी गमावून ३७१ धावा केल्या. नीलमशिवाय नंदिनी कश्यपनेही शानदार खेळी केली, तिने ७९ चेंडूत ८१ धावा केल्या. त्याचवेळी कांचन परिहारनेही ५२ चेंडूत नाबाद ५३ धावा केल्या. पण या मोठ्या लक्ष्याला प्रत्युत्तर देताना नागालँडचा संघ ४७ षटकांत सर्वबाद झाला. त्यांना केवळ ११२ धावा करता आल्या, त्यामुळे उत्तराखंडने हा सामना २५९ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला.

# हमरापुर विभाग प्रीमियर लीग ऑक्शन डे सोहळ्याचा शुभारंभ

**पेण : प्रतिनिधी**

हमरापूर विभाग प्रीमियर लीग २०२५च्या चौथ्या पर्वाच्या ऑक्शन डे सोहळ्याचे आयोजन १० डिसेंबर रोजी म्हाडा कॉलनी येथील रविराज फार्महाऊस येथे करण्यात आले होते. या वेळी युवा नेते वैकुंठ पाटील यांनी खेळाडूंनीही चमकदार खेळ करून सामन्यामध्ये रंगत आणावी, असे मार्गदर्शन करताना सांगितले.

सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे यांनी क्रिकेटची आवड असणाराच क्रिकेट सामने भरवत असतो व क्रिकेट खेळाडूंना प्रोत्साहन दिले. या हमरापूर विभाग प्रीमियर लीग ऑक्शन डे सोहळ्याचा शुभारंभ युवा नेते, जि.प.चे माजी विरोधी पक्षनेते तथा भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या हस्ते श्री गणेशाला पुष्पहार अर्पण करून व दत्ता कांबळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

या वेळी हिरामण कोकाटे, निळकंठ म्हात्रे, गोपीनाथ मोकल, अ‍ॅड. रोशन सावंत, महेश भिकावले, अ‍ॅड.जगदीश पाटील यांच्यासह अध्यक्ष सत्यादादा पाटील, उपाध्यक्ष समाधान पाटील, सचिव जयेश पाटील, सल्लागार खजिनदार दिगंबर नागे, सहसल्लागर दत्तात्रय म्हात्रे उपस्थित होते या क्रिकेट लीगमधील सामन्यांचा थरार २ ते ६ जानेवारीपर्यंत असा पाच दिवस क्रिकेटप्रेमींना पाहायला मिळणार आहे. लीगमध्ये दादर, रावे, सोनखार, उर्णोली, कळवे, जोहे, तांबडशेत, हनुमानपाडा, डावरे, कोपर, हमरापूर, वरेडी, खारसापोली, नवघर, अंतरे, पारणेश्वर हे सुपर १६ संघ सहभागी झाले आहेत. विजेत्यांना रोख रक्कत व आकर्षक चषक, देण्यात येणार असून स्पर्धा जोहे येथील जय गिरोबादेव मैदानावर खेळवण्यात येणार आहे.

# तिरंदाजी स्पर्धेत ‘सीकेटी’च्या सर्वेश स्थळे याला रौप्यपदक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबईतील कलिना विद्यापीठ येथे एसएफए चॅम्पियन २०२४ स्पर्धा नुकतीच पार पडली. यामध्ये १७ वर्षाखालील कंपाउंड आर्चरीत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सर्वेश स्थळे या विद्यार्थ्याने रौप्यपदक पटकावले.

सर्वेशने मिळवलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत , सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# अलिबागच्या शिव देवजी हीलमचा देशभरात डंका

**रेवदंडा : महेंद्र खैरे**

पंचकुला हरियाणा येथे ७ ते ९ डिसेंबर रोजी २५वी ज्युनिअर सिकाई मार्शल आर्ट राष्ट्रीयस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा २०२४/२५ झाली. या स्पर्धेत मध्ये अलिबागच्या तीन खेळाडूंनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत नेत्रदिपक कामगिरी करत अलिबागचे, रायगड व महाराष्ट्राचे नाव संपूर्ण देशभरात उंचावले.

या स्पर्धेत १८ वर्षा खालील –४० की. लो गटात लोबा (फाईट) प्रकारात उपांत्य फेरीत कर्नाटकला, उपांत्य फेरीत गोवाला व आंतिम फेरीत ओडिसाला हरवत शिव देवजी हीलम याने महाराष्ट्रासाठी एक सुवर्णपदक पटकाऊन नेत्रदीप कामगिरी केली तसेच देवदत्त

पडवळ याचे १४ वर्षाखालील गटात देशभरात पाचवे स्थान आले व ऋग्वेद नाईक याचे १४ वर्षखलील –३७ वाजनी गटात देशभरात पाचवे स्थान आले.



अलिबागच्या सर्व खेळाडूंचे सर्व सर्व स्तरावरून कौतुक होत आहे या सर्व खेळाडूंना मास्टर विजय चंद्रकांत तांबडकर व प्रियंका संदेश गुंजाळ, शुभम नखाते व वेदांत सुर्वे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.




वाढदिवसाच्या अभिष्टचिंतन...



अभीष्टचिंतन!

कुंडलिक विठ्ठल काटकर

(अध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा सहकार सेल)

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा!


भाजपा

सौजन्य : योगेश पाटील


# अल्झारी जोसेफला आयसीसीकडून दंड

**नेव्हिस : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजचा खेळाडू अलझरी जोसेफ याला अजून एक धक्का बसला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) मंगळवारी १० डिसेंबरला वेगवान गोलंदाज अल्झारी जोसेफला मैदानावरील आणखी एका गुन्ह्याबद्दल फटकारले. गेल्या रविवारी सेंट किट्स आणि नेव्हिस येथे बांगलादेश विरुद्ध वेस्ट इंडिजच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यादरम्यान या वेगवान गोलंदाजाला त्याच्या वागण्याबद्दल दंड आकारण्यात आला आहे.



**पंचांना केली होती शिवीगाळ**

अल्झारी जोसेफने खेळाडू आणि सपोर्ट स्टाफसाठीच्या ICC आचारसंहितेच्या अनुच्छेद २.३ चे उल्लंघन केल्याचे आढळून आले. आयसीसीच्या निवेदनानुसार, खेळ सुरू होण्यापूर्वी जोसेफने चौथ्या पंच ग्रेगरी ब्रॅथवेटला शिवीगाळ करताना नियमाचे उल्लंघन झाले.

ICC ने सांगितले की, ‘अल्झारी जोसेफने चौथ्या पंचांशी वाद घालताना आक्षेपार्ह आणि अपमानास्पद भाषा वापरली. अंपायरने अल्झारी जोसेफला स्पाइक्स घालून खेळपट्टीवर पाऊल ठेवू नये, असे सांगितले होते. याबाबत बोलत असताना अयोग्य भाषेचा वापर केला.

अल्झारी जोसेफला एक डिमेरिट पॉइंट देण्यात आला आहे. मैदानावरील पंच कुमार धर्मसेना आणि लेस्ली रेफर, तिसरे पंच आसिफ याकूब आणि चौथे पंच ग्रेगरी ब्रॅथवेट यांनी अल्झारी जोसेफवर हा आरोप केला आहे. अल्झारी जोसेफचा २४ महिन्यांतील दुसरा गुन्हा होता. अल्झारी जोसेफचा त्याच्याच वेस्ट इंडिज देशाच्या एकदिवसीय संघाचा कर्णधार शाई होपशी सुमारे महिनाभरापूर्वी मैदानावर जोरदार वाद झाला होता.

# निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत आता उपांत्य फेरीचा थरार



**मुंबई : प्रतिनिधी**

बीएआरसीने उपनगर कबड्डी असोसिएशन आयोजित जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या व्यावसायिक गटात उपांत्य फेरी गाठली. कुमार गटाच्या पश्चिम विभागात पार्ले स्पोर्टस् – अ ने उपांत्य फेरीत धडक दिली.

मुंबई उपनगरने संयोजन संस्था, चारकोप यांच्या सहकार्याने संचालिका नम्रता भोसले यांच्या सौजन्याने कांदिवली सेक्टर २ येथील दादोजी कोंडदेव क्रीडांगणावर या स्पर्धेचे आयोजन केले आहे. बीएआरसीने व्यावसायिक गटात शुभश्री इंटरप्रेजेसचा १९–०९ असा पाडाव करीत हा मान मिळविला. सुकेश जगताप, चिराग राणे यांच्या चढाई पकडीच्या सर्वांगसुंदर खेळामुळे हे शक्य झाले. उपांत्य फेरीत त्यांची गाठ साईश्रद्धा सप्लिमेशन संघाशी पडेल.

पश्चिम विभागीय कुमार गटात पार्ले स्पोर्टस् – अ ने सह्याद्री क्रीडा मंडळाचा प्रतिकार ३८–१७ असा सहज मोडून काढत प्रथम उपांत्य फेरी गाठली. आक्रमक सुरुवात करीत दोन लोण देणाऱ्या पार्ले संघाने पूर्वार्धात २५–०५ अशी आघाडी घेत अर्धे काम फत्ते केले. उत्तरार्धात आणखी १३ गुण घेत आपला विजय निश्चित केला. ईशांत शिंदे, प्रशांत पवार, अभिषेक यादव यांच्या झंझावाती खेळाने पार्लेकरांना हा मोठा विजय शक्य झाला. सह्याद्रीचा उत्तम नार्वेकर उत्तरार्धात चमकला.

याच गटात उपउपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात सिद्धिविनायक – अ ने संघर्ष – अ ला ३२–१६ असे नमवित उपांत्यपूर्व फेरी गाठली. मध्यांतराला २०–१० अशी आघाडी घेणाऱ्या सिद्धिविनायकने नंतर सावध खेळ करीत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. ओम् कुदळे, साई जाधव यांच्या चतुरस्त्र खेळाने हा विजय साध्य केला. संघर्षचा निमिष यादव बरा खेळला.

दुसऱ्या सामन्यात जाखमाता मंडळाने रत्नदीप मंडळाचे आव्हान १९–१६ असे संपुष्टात आणले. विश्रांतीला १३–०५ अशी आघाडी घेणाऱ्या जाखमाताला नंतर मात्र विजयासाठी रत्नदीप संघाने चांगलेच झुंजविले. विजयी संघाचे दर्शन नात्ती, अर्पित धनावडे उत्कृष्ट खेळले. विश्रांतीनंतर सुर सापडलेल्या रत्नदिपच्या रितेश मोरे, सुशांत मेने यांनी संघाचा विजय आवाक्यात आणला होता, पण वेळेचे गणित नजमल्याने त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.


वर्ष ४१ वे | ॥ॐ श्री बाळकृष्णाय नमः ॥ | स्थापना १९८३

मार्गशिर्ष शुद्ध (त्रयोदशी) ते दत्तजयंती मार्गशिर्ष शुद्धपौर्णिमा अखंड हरिनाम सप्ताह

श्री स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर

राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ भाऊसाहेब महाराज की जय ॥ राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ गिरीमल्लेश्वर महाराज की जय ॥

राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ बाळकृष्ण महाराज की जय ॥ राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ दादा महाराज की जय ॥

राजाधिराज श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज की जय ॥ श्री. स.स. प्रेमचैतन्य महाराज की जय ॥

गुरु चरणी ठेवीता भाव । आपोआप भेटे देव ॥




अनंत कोटी ब्रम्हांडनायक श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज यांच्या आशिर्वादाने व स्वानंद सुखनिवासी चांगू काना ठाकूर व स्वानंद सुखनिवासी भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रेरणेने पूनीत शिवाजीनगर माऊली मंदिरामध्ये श्री.स.स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर, यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरू चरित्रामृत ग्रंथ, श्री दासबोध ग्रंथ, एकनाथ भागवत ग्रंथाचे पारायण पर्वणी प्रारंभ मार्गशीर्ष शुध्द ॥१३॥, शके १९४६, शुक्रवार दि. १३/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. प्रारंभ ते मार्गशीर्ष शुध्द ॥१५॥ पोर्णीमा शके १९४६, रविवार दि. १५/१२/२०२४ रोजी दुपारी १२.०० वा. माऊलीवर पुष्पवृष्टी होणार आहे. सर्व भागातील गुरूबंधू, भाविक भक्तांनी उपस्थित राहून आपला देह सार्थकी लावावा. तसेच भजन, प्रवचन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

नित्याचे कार्यक्रम

| सकाळी | सकाळी | सकाळी | सकाळी | दुपारी | दुपारी | सायंकाळी | सायंकाळी | रात्री |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ ते ०६ | ०६ ते ०९ | ०९ ते १० | १० ते १२ | १२ ते ०१ | ०२ ते ०६ | ०६ ते ०७ | ०७ ते ०८ | ०९ ते ११ |
| काकड आरती | श्रीची नित्यपुजा | संगित भजन | प्रवचन | दुपार ची आरती | संगित भजन | संध्याकाळची आरती | ग्रंथ वाचन व ध्यान | भजन व किर्तन |

दैनंदिन कार्यक्रम

शुक्रवार दिनांक १३/१२/२०२४

| | |
|---|---|
| सकाळी ८.०० ते १०.०० - भजन | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावेखाडी (उत्तरपाडा), बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर पखवाज : आत्माराम मोकल, जयराम म्हात्रे (न्हावा) |
| सकाळी १० ते १२ - प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर श्री. भागवत साहेब, पुणे, ह.भ.प. आप्पा पांचाळ, चिपळून श्री. रमण ठाकूर, न्हावाखाडी, श्री. अरुणशेठ ठाकूर |
| दुपारी २ ते ४ - भजन | भावभक्ति महिला भजन मंडळ, गव्हाण-खारकोपर गायीका : सौ. रत्नप्रभा घरत, श्रीमती हिरुबाई घरत, सौ. चंद्रप्रभा घरत, सौ. आनंदी घरत श्री. गुरुकृपा प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर गायीका : सुप्रिया घरत आणि मंडळी पखवाज : तुषार घरत (चिर्ले उरण) |
| दुपारी ४ ते ६ - भजन | संत जनाबाई प्रासादिक भजन मंडळ गायिका : सौ. पुनम ठाकूर, सौ. रुपम वास्कर, हर्षद फडके, पखवाज : श्री. मधुकर धोंगडे, केतन फडके |
| सायं. ८ ते ९ - भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर बुवा : वसंतशेठ पाटील, नितीन ठाकूर (खारकोपर) पखवाज : श्री. गौरव म्हात्रे, तुकाराम कोळी (गव्हाण) |
| रात्री ९ ते ११ -किर्तन | श्री. ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज घाटाव (रोहा) |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग |

शनिवार दिनांक १४/१२/२०२४

| | |
|---|---|
| सकाळी ८.०० ते १०.०० - भजन | श्री. राधाकृष्ण भजन मंडळ, शिवाजीनगर बुवा : रशिक कानडा आणि मंडळी पखवाज : कु. परितोष हातचांगे (बेलपाडा) तबला : रुतुजा कानडा |
| सकाळी १० ते १२ - प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर श्री. भागवत साहेब (पुणे), ह.भ.प. आप्पा पांचाळ (चिपळूण) |
| दुपारी २ ते ४ | श्री विश्वंभर भजन मंडळ, गव्हाण, गायक : हेमंत कोळी पखवाज : प्रशांत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ४ ते ६ | विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ, कोपर गायीका : सौ. अनुसया घरत, सौ. इंदुताई म्हात्रे, सौ. नंदा पाटील, सौ. आनंदी घरत, सौ. अनिता म्हात्रे, सौ. वासंती ठाकूर. वादक : दिनेश घरत |
| रात्री ८ ते ९ - भजन | एकादशी भजन मंडळ, न्हावे बुवा : रामनाथ पाटील आणि मंडळी |
| रात्री ९ ते ११ - किर्तन | श्री. ह.भ.प. प्रकाश महाराज पाटील आणि मंडळ, कुंडेवहाळ |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर भजन रमन ठाकूर, शिवाजी ठाकूर, गजानन ठाकूर, पद्माकर ठाकूर (न्हावा खाडी), पांडूरंग रसाळ, आत्माराम मोकल, पद्माकर ठाकूर (शिवाजीनगर), किसन मोकल, मधुकर ठाकूर |

रविवार दिनांक १५/१२/२०२४

| | |
|---|---|
| सकाळी ८.०० ते १०.०० - भजन | नादब्रम्ह साधना भजन मंडळ (रांजणपाडा - ओवेपेठ) देवसागर साधक समाज सामुदाईक संगित भजन बुवा : निवृत्ती चौधरी, अक्षय चौधरी (रांजणपाडा), ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंतशेठ पाटील, गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, सुरेश ठाकूर, डॉ. निवृत्ती म्हात्रे, रामनाथ पाटील, महेश पाटील (न्हावा), भाऊ ठाकूर (शिवाजीनगर). पखवाज : निलेश पाटील |
| सकाळी १० ते १२ - प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर |
| दुपारी १२ वाजता | श्री. बाळकृष्ण माऊलीवर पुष्पवृष्टी |

- व्यवस्थापक -

देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय), शिवाजीनगर - गव्हाण-खारकोपर न्हावे - न्हावेखाडी - (संचलित)

- संयोजक -

श्री. रामशेठ ठाकूर [मा.खासदार, रायगड], व परिवार आणि ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

कार्यक्रमाचे स्थळ : श्री.स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर, मु. शिवाजीनगर, पो.गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. फोन नं. ९१६७९९१०४५

प्रसंगानुसार कार्यक्रमात फेरबदल करण्यात येईल । कार्यक्रमाच्या वेळेला महत्व दिला जाईल.